# स्वरूपयोग




ऑक्टोबर २०२०

वर्ष तेवीस, अंक चौथा

त्रैमासिक वर्गणी ₹ २५

# स्वामी माधवानंद यांचे श्रीमद्भगवद्गीतेवरील विवरण ग्रंथ


## धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे (श्रीमद्भगवद्गीता अध्याय १)




श्रीमद्भगवद्गीतेच्या पहिल्या अध्यायातून आमच्या मन-बुद्धीत गीतेचा प्रारंभ होत आहे. अशी सर्वसाधारण समजूत असते, की पहिल्या अध्यायात युद्ध न करण्याचा मोह यापलीकडे काही नाही. पण दुरून दिसणारा डोंगर जवळ जाऊन पाहिल्यावर आत एक सुंदर लेणं असावं, तसं महाभारतात गीतेचं कोरीव लेणं आहे आणि पहिला अध्याय हे त्या लेण्याचं आकर्षक प्रवेशदालन आहे. महाभारताच्या कथेच्या रम्य वाटेवरून प्रवास करत हा अध्याय गीतेच्या अंतरंगात शिरण्याची उत्सुकता आपल्याला निर्माण करतो.

कळी उमलताना जसा आंतरिक सुगंधाचा मार्ग मोकळा होत जातो, तसं प्रत्येक पद उकलताना ज्ञानाचा सुगंध प्राप्त होतो. जणू काही भक्तियुक्त अंतःकरणातील ज्ञानाचं गान म्हणजे गीता. भगवानांनी गायलेलं ज्ञानाचं गीत, त्या गीतेचे स्वर मन-बुद्धीत निनादत, ते ऐकता ऐकता आपल्या अंतरी पूर्ण भरून राहतील.

## सद्बुद्धियोग (श्रीमद्भगवद्गीता अध्याय २)





जे सदासर्वदा सगळीकडे सतत आहे त्यालाच सत् म्हणतात. त्यालाच आपण परमात्मा किंवा देव असं म्हणतो. ज्या ज्ञानधारणांमध्ये हे मांडलं आहे, त्यांना सांख्य असं म्हणतात आणि बुद्धीच्या माध्यमातून समजून घेऊन ध्यानातून देवाशी एकरूपता अनुभवणं म्हणजे योग, म्हणून याला सद्बुद्धियोग असं म्हटलं आहे.

ईश्वराच्या दिशेने पडलेल्या पहिल्या पावलापासून त्याची समाधीत भेट होईपर्यंतचा सर्व प्रवास म्हणजे कर्मयोग, सर्व उपासना, ध्यानयोग यांचा बुद्धियोगात अंतर्भाव आहे.

सांख्य तत्त्वधारणांचा गाभा काय आहे? कर्मयोग आणि बुद्धियोग यांचं परस्परांशी नातं काय आहे? योगाच्या विविध व्याख्या नेमकं काय सांगतात? स्थितप्रज्ञ या अत्युच्च पातळीवरचा माणूस कसा असतो? प्रत्येक श्लोकाचे बोल आमच्या कानांनी कसे ऐकावेत? त्यातील स्वतःशी संबंधित काय आणि कसं करावं? याचं मार्गदर्शन या पुस्तकातून घडेल. ज्ञानेश्वर महाराजांच्या ओव्यांच्या सुगंधाने प्रसन्न झालेल्या वाटेने जाताना त्या सुगंधी ओवी-फुलांच्या सौंदर्याने हरखून जावं असं हा ग्रंथ वाचताना वाटेल.

## कर्मयोग (श्रीमद्भगवद्गीता अध्याय ३)




जगण्याच्या प्रत्येक क्षणाला अर्थ प्राप्त करून देणारा आणि प्रत्येक कृतीला भरीवता प्राप्त करून देणारा कर्मयोग जाणून घेण्याची उत्सुकता सर्वांना असते. उत्कृष्ट कर्म करण्यासाठीची मनोभूमिका, ज्ञानमय जीवन जगण्यासाठी स्वतःच्या अंतःकरणाची योग्यता कर्माद्वारे कशी वाढवत न्यावी याचे हे मार्गदर्शन आहे.

कर्तव्यकर्माच्या कोरडेपणाला ईश्वरभावनेच्या जलाने जिवंतपणा येतो. ईश्वरभावनेच्या तीर्थासहित कर्मयोग आचरणाऱ्या साधकाला चित्ताच्या प्रसन्नतेचा प्रसाद प्राप्त होतो आणि प्रसाद देणाऱ्या परमात्म्याची प्रत्यक्ष भेट घेण्यासाठी तो उत्साहाने चालू लागतो.

आपले प्रश्न दुसऱ्याकडे जाऊन सुटत नाहीत. त्यासाठी जावं लागतं स्वतःकडे- बुद्धीपलीकडच्या 'स्व'कडे. 'स्व'मधूनच मिळते सत्त्वशक्ती स्वतंत्रतेत जगण्याची, सर्वांना साहाय्य होत आत्मकल्याण साधण्याची.

कर्म आवश्यक आणि अपरिहार्य, कर्म-यज्ञ, ज्ञानी व्यक्तीचे लोककल्याणार्थ कर्तव्य, कर्मसमर्पण आणि श्रद्धा, काम-नियंत्रण आणि आत्मारामाचा वेध- या पाच भागांतून अभ्यासकांसाठी दीपस्तंभ व्हावा अशा रीतीने कर्मयोगाची विविध अंगे यांत प्रकाशित केली आहेत.

# स्वरूपयोग

## वार्तापत्र

**वर्ष २३, अंक ३, ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०२०**

मूल्य ₹२५, वार्षिक वर्गणी ₹१००

आजीवन सभासदत्व ₹२,५००

परदेशी सभासदांसाठी US $ 25, Life Membership US $ 375

**• प्रकाशक व प्रेषक : स्वरूपयोग प्रतिष्ठान •**

**• संपादिका •**

सौ. आशा माधव नगरकर

**• सहसंपादिका •**

सौ. रोहिणी मांडवगणे

**• अक्षरजुळणी •**

स्वरूपयोग साधक परिवार

**• अंक मांडणी व सजावट •**

शीतल भालेराव



**स्वरूपयोग प्रतिष्ठान**

द्वारा : सौ. आशा माधव नगरकर

८८५/३ शिवाजीनगर, भांडारकर रोड,

गल्ली क्र. ६, पुणे ४११ ००४, महाराष्ट्र (भारत)

फोन : ९१-२०-२५६५२४५७

(कार्यालयीन वेळ - रविवार सोडून सकाळी ११ ते दुपारी ४)

अन्य वेळांसाठी फोन : २५४४१०३६/८२७५१४५२५१

E-mail : swaroopyog@gmail.com

For Vartapatra : swaroopyogvp@gmail.com

Website : www.swaroopyog.net



**• मुद्रक : बालोद्यान प्रेस •**

१३५८ अ, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२

E-mail : balodyanpress@gmail.com



- या मासिकातील नामनिर्देश केलेले लेख सोडून अन्य सर्व लेख स्वामी माधवानंद (डॉ. माधव बाळकृष्ण नगरकर) यांच्या प्रवचनांतून, सत्संगांमधून अथवा लेखनातून घेतलेले आहेत.
- या मासिकातील लेखनाचे सर्व हक्क संपादिकेच्या स्वाधीन आहेत.
- पुनर्प्रकाशनासाठी संपादिकेची लेखी परवानगी घेणे कायदेशीररीत्या बंधनकारक आहे.


## • अनुक्रमणिका •


- **गीतेतील ध्यानयोग आणि त्याची वैशिष्ट्ये** २
  (अध्याय ९, लेखांक १)
- **सरस रामायण** ६
  (सुंदरकाण्ड, लेखांक १०)
- **श्रीमत् दासबोध स्वाध्याय** १०
  (अर्चनभक्ती, दशक ४, समास ५, लेखांक २)
- **श्रीमत् भागवत स्कंध ९** १३
  (भगवद्भक्त अंबरीशाची कथा)
- **युवाविश्व**
  - स्वातंत्र्यदिन विशेष स्वाध्याय - प्रसाद घारपुरे १६
  - दासबोध दशक ६ समास ७- सगुण भजन-पूर्वार्ध - अतुल दीक्षित २१
- **आमचे गीताध्ययन** - *प्रदीप चंद्रचूड* २४
- **अभिप्राय** - *अनिल बेडेकर* २३
- **अभिनंदन** - *अभिषेक काळे* १५
  - *मृणाल बोडस* १९
  - *अद्वैत जोशी* २०
  - *ईशा चिडगोपकर व साक्षी रंजलकर* २२
  - *मैत्रेयी बिस्वास* २३
  - *अनुशा परांजपे* २४


**• मुखपृष्ठ •**

**पँगॉन्ग लेक, लडाख**

**छायाचित्र - चिन्मयी कुलकर्णी, पुणे हिच्या कॅमेऱ्यातून**

**स्वरूपयोग परिवारातर्फे**

**शुभ दीपावली**

**आणि**

**नाताळच्या शुभेच्छा!**

# गीता आणि ज्ञानेश्वरीतील सौंदर्ययोग

(अध्याय ९, लेखांक १)

श्रीज्ञानदेवांनी दहाव्या अध्यायात पहिल्या नऊ अध्यायांचा आढावा घेताना म्हटलं आहे, की- नवव्या अध्यायाची खोली आणि एकूण महानता अनुर्वाच्य आहे. गूळ, साखर आणि काकवी यांचे बांधे एकाच (उसाच्या) रसाचे असले, तरी स्वाद आणि गोडी आन-आन म्हणजे वेगवेगळे असतात, तसे हे गीतेचे अध्याय एकाच अध्यात्मरसाचे असले, तरी स्वाद आणि गोडीबाबत भिन्न भिन्न आहेत. असे असले, तरी नवव्या अध्यायाची गोडी शब्दांनी व्यक्त करता येणं अशक्यच आहे.

*अहो गूळ साखरे मालयाचे। बांधे तरी एकचि रसाचे।*
*परि स्वाद गोडियेचे। आन आन जैसे॥१०.३४॥*
*हे ऐसे अध्याय गीतेचे। परि अनिर्वाच्यपण नवमीचे।*
*तो अनुवादलो हें तुमचें। सामर्थ्य प्रभू॥१०.३५॥*

या नवव्या अध्यायाचं नमनही माउलींच्या मुखातून आगळंवेगळं असंच साकारलं आहे. पहिल्या ओवीत ते म्हणतात- तुम्ही एकमात्र अवधान दिलंत, तर सुख-सुख असं ज्याला म्हणतात, त्या सर्व सुखाच्या प्राप्तीला पात्र व्हाल हे माझं प्रतिज्ञेचं वचन मी तुम्हांला उघड सांगतो, ते ऐका!

*तरी अवधान एकलें दीजे। मग सर्वसुखासि पात्र होइजे।*
*हें प्रतिज्ञोत्तर माझें। उघड आइका॥१॥*

हे उद्‌गार उत्साहाच्या भरात थोडे जास्त जोरकस आले, म्हणून पुढल्या ओवीत अत्यंत लीनतेने, मार्दवपूर्ण शब्दांत माउली म्हणतात- तुम्हां सर्वज्ञ श्रोत्यांपुढे हे मी प्रौढीने बोलत नाही, अवधान द्यावं ही माझी सलगीची, प्रेमातून आलेल्या जवळिकीची विनंती आहे.

*परि प्रौढी न बोले हो जी। तुम्हां सर्वज्ञांच्या समाजीं।*
*देयावें अवधान हे माझी। विनवणी सलगीची॥२॥*

लळा म्हणजे प्रेमातून साकारणारी आवडीची ओढ. तसेच मनातले इच्छा-संकल्प म्हणजे मनोरथ हे लडिवाळांचे लळे किंवा मनोरथ बाळगणाऱ्यांचे मनोरथ जर तुमच्यासारखी श्रीमंत माहेरे असली तर पूर्ण होतात.

*कां जे लळेयाचे लळे सरती। मनोरथांचे मनोरथ पुरती।*
*जरी माहेरें श्रीमंतें होती। तुम्हां ऐसीं॥३॥*

तुमच्या दृष्टीतल्या स्नेहाच्या ओलाव्याने अंतरात प्रसन्नतेचे मळे बहरले आहेत, ती शीतल सावली पाहून (सांसारिक तापांनी) श्रांत झालेला मी त्या शीतलतेत पहुडतो आहे.

प्रभू, तुम्ही सुखामृताचे डोह आहात, म्हणून आमच्या स्वतःच्या इच्छेनुसार त्यात मनसोक्त डुब्या घेऊन अंग पुरं ओलं करून, शीतल करून घेऊ पाहतो. इथेही जर आम्ही सलगी करायला भिऊ लागलो, तर दुसरीकडे कुठे बरं तप्त झालेल्या स्वतःला निववणार?

नाही तरी बालकाचं बोबडं बोलणं किंवा वेडीवाकडी पावलं टाकत चालणं पाहून, त्याचं कौतुक करून, आई जशी आनंदते, तशी तुम्हां संतांची प्रेमाची आवड कशी का होईना, आम्हांला लाभावी, या मोठ्या उत्कट इच्छेने मी आपणाशी सलगी करत आहे.

एरवी आपल्यासारख्या सर्वज्ञ श्रोत्यांना मी सांगून शिकवावं, असं काही आहे का? सरस्वतीच्या पुत्राला कित्त्यावरून वा धडे देऊन वाचणं शिकायला लागेल काय?

काजवा कितीही मोठा असला, तरी सूर्यतेजापुढे तो काय तळपणार? अमृताच्या ताटात वाढावी अशी पाकसिद्धी कोठून आणणार? चंद्राला शीतल करायला विंझणवारा घालणं किंवा नादब्रह्माला गायन ऐकवणं वा दागिन्यालाच दागिना घालणं असं कुठे होईल का? सुगंधाने कशाचा वास घ्यावा? सागराने कुठे न्हायला जावं? हे सगळं आकाशच मावेल, एवढी व्यापक गोष्ट असू शकेल का? तसं तुमचं अवधान आकर्षित होऊन, तृप्त होऊन, तुम्ही 'आहे बुवा!' म्हणाल, असं वक्तृत्व कोणाजवळ आहे?

पण तरीही मी तुमच्यासारख्या सर्वज्ञ श्रोत्यांपुढे बोलतोय हे कसे? तर विश्व उजळून टाकणाऱ्या सूर्याची त्याला प्रेमाने काडवातीने ओवाळून आरती केली जात नाही का? समुद्राला त्याच्यातलंच चुळकाभर पाणी घेऊन अर्घ्य देत नाहीत का?

**सर्व श्रोत्यांमध्ये आपले सद्गुरू निवृत्तिनाथ बसले आहेत, याचे भान ठेवून ज्ञानदेव हे म्हणत आहेत.** निवृत्तिनाथांच्या रूपात भगवान शिव आहेत या भावाने ते म्हणतात,

*प्रभू तुम्ही महेशाचिया मूर्ती।*
*आणि मी दुबळा अर्चितसें भक्ती।*
*म्हणोनि बोल जऱ्ही गंगावती।*
*तऱ्ही स्वीकाराल कीं॥१४॥*

बेलाची पाने जेव्हा मिळत नाहीत, तेव्हा गंगावती म्हणजे निर्गुडीच्या पानाने पूजा करतात. ते तुम्ही जसे स्वीकारता, तसेच माझे बोल स्वीकाराल. असे म्हणून श्रीज्ञानदेव घरातील प्रेमाच्या व्यवहाराचा सुंदर दृष्टांत देत म्हणतात- बालक बापाच्या ताटातलं स्वतःच्या हाताने स्वतः खाण्याऐवजी, बाप जसा त्याला घास भरवतो तसा बापालाच घास भरवू लागतो आणि बापही संतोषून कौतुकाने मुख पुढे करून तो घास घेतो. तसं माझं तुमच्यापुढे सांगणं आणि तुम्ही ते ऐकणं आहे.

*बाळक बापाचिये ताटीं रिगे।*
*आणि बापातेचि जेववूं लागे।*
*कीं तो संतोषलेनि वेगें। मुखचि वोढवी॥१५॥*

पुढे महाराज असाच एक दृष्टांत देतात, की तान्ह्या वासराने गायीच्या स्तनाला जसजशा ढुसण्या द्याव्या तसतसा तिला अधिकच पान्हा फुटतो. त्याच्या रोषाने प्रेमच दुप्पट होते. तुमच्या या लेकराच्या बोलाने तुमचं निजलेलं कृपाळूपण जागं झालं असं जाणवलं म्हणून मी एवढं सगळं बोललो.

एवढं बोलूनही दृष्टांतांची उत्स्फूर्तता किंचितही कमी झालेली नाही. निवृत्तिनाथांना (आणि श्रोत्यांतील ज्ञानी व्यक्तींना) ज्ञान हे उपजतच आहे, त्यासाठी त्यांना काही प्रबोधन देणं हा पोरखेळच होईल, या भावाने महाराज म्हणतात, एरवी चांदणं काय अढीत घालून पिकवावं लागतं की काय? याने एक भव्य कल्पना मनी येऊन जाते, की चंद्र-चांदण्यांना तेज आणून ते वाढवण्यासाठी, परमेश्वराने आकाशाची मोठ्ठी अढी घालून तिच्यात त्यांना पिकवत तर ठेवलं नाही? छे छे, तसं नाही काही, त्यांना स्वतःचंच तेज असतं, तसं ज्ञानी व्यक्तींचं ज्ञान त्यांच्यात सहज स्वयंस्फूर्त असतं! चांदणं अढीत पिकवावं लागत नाही, वाऱ्याला वेग द्यावा लागत नाही, गगनाला गवसणी घातली जात नाही, पाण्याला पातळ करावं लागत नाही, तयार झालेल्या लोण्याला परत घुसळावं लागत नाही, तसं परमात्मस्वरूपी तदाकार होऊन राहिलेल्या स्थितीत असलेल्या ज्ञानी व्यक्तीपुढून शब्द लाजून परत फिरतात.

*हें असो, शब्दब्रह्म जिये बाजे।*
*शब्द मावळलेया निवांतु निजे।*
*तो गीतार्थु मऱ्हाटिया बोलिजे। हा पाडु काई॥२२॥*

शब्दब्रह्म म्हणजे वेद. त्यातील शब्दांनी व्यक्त होणारा ज्ञानमय भाग. परमात्म्याशी तदाकार स्थिती ही जणू बाज. त्या बाजेवर जो पहुडला आहे, त्याला त्या स्थितीचं वर्णन करणाऱ्या शब्दरूप दिव्यांची आणि त्यांच्या अर्थाच्या रूपाने असणाऱ्या प्रकाशाची काही गरज नसते, म्हणून ते शब्दांचे दिवे मावळून तो त्या स्थितीत परमात्मतदाकार होऊन निवांत पहुडलेला असतो. ही स्थिती सांगणारा गीतार्थ मराठीतून विवेचन करणं हे शक्य तरी आहे का? (काय हे साहस!)

असं असतानाही मी निरूपण करायला धजत आहे तो एकाच आशेने, की अशी धिटाई करून, (हे गुरू श्रीनिवृत्तिनाथा आणि सर्व ज्ञानी श्रोतेजन हो) तुमचं लाडकं व्हावं!

तरी आता चंद्रापेक्षा शीतल करणाऱ्या, अमृताहूनही जीवन देणाऱ्या तुमच्या अवधानाने, गीतार्थ सांगण्याच्या माझ्या मनोरथांना पुष्टी द्या.

अगदी सुरुवातीच्या ओवीत 'अवधान येकले दीजे।' त्याने सर्व सुख पावण्याला पात्र व्हाल हे माझं प्रतिज्ञोत्तर उघड ऐका असं म्हटल्याबरोबर श्रोत्यांमध्ये सद्गुरू निवृत्तिनाथ आहेत, त्यांच्यापुढे असं जोरकस बोलणं झालं, याने त्यांचा अधिक्षेप तर झाला नाही? शिष्यमर्यादा तर ओलांडली गेली नाही? असं वाटून की काय, ज्ञानदेवांनी नम्रता आणि लडिवाळपणा यांनी सर्वांची मनं जिंकली असं म्हणायला हवं.

पुढे अप्रतिम दृष्टांतांसह हा आर्जवी, मृदू भावप्रवाह वाहतोच आहे. ज्ञानेश्वर महाराज श्रोत्यांना आणि मुख्यतः त्यामध्ये विराजमान असलेल्या गुरू निवृत्तिनाथांना म्हणतात- तुमच्या दृष्टीतून कृपेचा वर्षाव झाला असता, मती म्हणजे बुद्धीच्या ठायी सर्व विधानांच्या अर्थसिद्धीचं पीक येतं, पण तुम्ही कृपादृष्टीचा वर्षाव केला नाहीत, तर उन्मेष अर्थात् अंकुरलेला ज्ञानरूपी कोंभही सुकून जाईल.

*का जैं दिठिवा तुमचा वरुषे।*
*तै सकळार्थसिद्धि मतीं पिके।*
*येऱ्हवीं कोंभेला उन्मेष सुके। जरी उदास तुम्ही॥२५॥*

सहज तरी पाहा, वक्तृत्वरूपी पाखराला तुमच्या अवधानाचा चारा मिळाला, तर ज्यांना क्षर नाही अशा अक्षर प्रमेयांची म्हणजे सिद्धांतांची दोंदे म्हणजे पुष्ट झालेला पोटाचा भाग ते पेलू शकेल.

अर्थ जणू बोलाची वाटच पाहत असतो (तो मनी आधीच असतो, आणि शब्दरूपातून प्रकट होतो). एका अभिप्रायातून म्हणजे आशयातून दुसरे अधिक सखोल अभिप्राय निघू लागतात. बुद्धीवर भावफुलांचा बहर येतो.

वक्त्याच्या अंतःकरणात उठलेल्या उन्मेषांचे बोल आणि श्रोत्यांच्या अंतःकरणात त्यानुरूप उठणारा अर्थ वा भाव अशा संवादाचा सुवायू वाहू लागला तर त्यांचे हृदयरूप आकाशात सारस्वताचे म्हणजे ब्रह्मज्ञानाचे मेघ वोळतात अर्थात वृष्टी करतात.

पण श्रोता दुश्चित्त असला, तर निर्माण होत असलेला रसही विरून जातो. अहो, चंद्रकांत मण्याला चंद्रप्रकाशाने पाझर फुटतो, तसे श्रोते हे चंद्रासारखे असतात. त्यांच्या अवधानाने वक्तारूपी चंद्रकांत मण्याला वक्तृत्वाचा पाझर फुटतो. श्रोतेरूपी चंद्र (अवधान धरून) नसेल, तर वक्ता वक्ता राहत नाही, म्हणजे त्याचं वक्तृत्व रसपूर्ण होऊ शकत नाही.

*चंद्रकांत द्रवता कीर होये।*
*परि ते हातवटी चंद्रीं की आहे।*
*म्हणऊनि वक्ता तो वक्ता नोहे। श्रोतेनिविण॥२९॥*

अवधान द्या असे सांगण्यापासून वक्तृत्वरस निर्माण होण्यापर्यंत सर्व काही कसे होते हे सांगून झाल्यावर श्रीज्ञानदेव हा भाव प्रकट करत आहेत, की नाही तरी हे सगळं बोलणं, गीतार्थ सांगणं हे निवृत्तिनाथच आपल्या कृपेने मला स्फुरण देऊन करून घेणार आहेत, आणि यात माझं काही कर्तृत्व नाहीच आहे, तर मी त्यांना सांगण्या-सुचवण्याची उठाठेव कशाला करू? आम्हांला गोड करून घ्या अशी तांदुळांनी विनंती कशासाठी करावी?

साइखडिया म्हणजे कळसूत्री बाहुल्यांना दोरांनी नाचवणारा सूत्रधार असतो, त्याला त्या बाहुल्यांनी आम्हांला छान नाचव अशी काही प्रार्थना करावी लागते का?

*परि आतां आमुते गोड करावें।*
*ऐसें तांदुळीं कासया विनवावें।*
*साइखडियानें काई प्रार्थावें। सूत्रधारातें॥३०॥*

तो सूत्रधार बाहुल्यांना त्यांच्या इच्छेसाठी नाचवतो का आपलं कौशल्य दाखवून ते वाढवत राहण्यासाठी नाचवतो? म्हणून आम्हाला या उठाठेवी करण्याचं कारण काय?

*तो काय बाहुलियांचिया काजा नाचवी।*
*कीं आपुलिये जाणिवेची कळा वाढवी।*
*म्हणऊनि आम्हा या ठेवाठेवी। काय काज॥३१॥*

ज्ञानदेवांचा भाव हा आहे की पुढचे बोल निवृत्तिनाथच बोलवून घेतील, मी उगीच श्रोत्यांना अवधान द्या म्हणणं, निवृत्तिनाथांना कृपा करा अशी प्रार्थना करणं वगैरे करत बसलोय. हे ऐकून ते एखादा शब्द तरी उच्चारतील आणि ती गुरूंची अनुज्ञा म्हणून विवरणाला सुरुवात करायची. झालंही तसंच! ते म्हणाले, 'हे तुझं सगळं बोलणं, त्यामागचं आर्जव, मनातली प्रार्थना हे सर्व आम्हांला पावलं. आता नारायणांनी काय निरूपण केलं आहे ते विवरण करून सांग.'

*तंव श्रीगुरु म्हणती काइ जाहलें।*
*हें समस्तही आम्हां पावलें।*
*आतां सांगें जें निरोपिलें। नारायणें॥३२॥*

श्रीज्ञानदेव जणू याचीच वाट पाहत होते, की गुरूंनी 'ग्रंथनिरूपण कर' असं म्हणावं. ती गुरुआज्ञा मानून पुढचं सांगण्याचं सगळं कर्तृत्व त्यांच्या पायी सहजच अर्पण होईल. ही अपेक्षा पूर्ण झाल्याने संतोष पावून ते बोलू लागले.

*येथ संतोषोनि निवृत्तिदासें। जी जी म्हणऊनि उल्हासें।*
*अवधारा श्रीकृष्ण ऐसें। बोलते जाहले॥३३॥*

श्रीज्ञानेश्वरीतल्या सुंदर नमनांपैकी हे नवव्या अध्यायाचं नमन आहे. यात श्रोता-वक्त्याचा संबंध, श्रोत्यांच्या अवधानाचं महत्त्व, रसोत्पत्ती, माउलींचा गुरूंच्या ठायी असलेला भाव, कर्तृत्वसमर्पण हे सर्व अत्यंत सुंदर दृष्टांत-अलंकार यांसह व्यक्त झालं आहे. शिष्यांनी कार्य करताना त्यांचा भाव कसा असावा याची नकळत शिकवणही दिली गेली आहे. महाराजांनी म्हटलं आहे, की गीतेच्या सर्व अठरा अध्यायांतल्या सातशे श्लोकांत जे सांगितलं आहे, तो सगळा अभिप्राय एकट्या नवव्या अध्यायात आला आहे. अध्याय तर महत्त्वाचा आहेच, आणि विवरणही अप्रतिम आहे, पण एकूण अध्यायात अतिशय सूक्ष्मता आणि व्यापकता एकत्रपणे नांदत आहेत. नमन हे या सर्व महत्तेला साजेल असं सुंदर, काव्यमय, भाव आणि वाङ्मयीन सौंदर्याने आलंकृत आहे. अवधान देऊन अध्याय पाहण्याची, जाणून घेण्याची तयारी करून घेणाऱ्या या नमनालाच एक नमन करून अध्यायाचे पान उघडून त्यातील सौंदर्ययोग निरखून पाहायला लागू.

(क्रमशः)

## निवेदन

सध्याच्या कोविड १९च्या पार्श्वभूमीवर या वर्षी स्वरूपयोगाश्रमामधील शिबिराचे आयोजन आपण करू शकू असे दिसत नाही. तरी सर्व साधकांनी याची नोंद घ्यावी ही विनंती. आपण आपापल्या ठिकाणीच राहून, पूजनीय स्वामीजींनी आपल्याला सांगितल्यानुसार नित्य साधना करत राहावी आणि सुरक्षित राहावे.

## स्वरूपयोगच्या सर्व साधकांना आनंदवार्ता

कोविड १९ आणि लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर आता स्वरूपयोग पुणे केंद्र, अमेरिका केंद्र आणि ध्यान केंद्र- Online माध्यमातून सुरू झाली आहेत. ध्यान केंद्र सोडून इतर सर्व केंद्रे आपण फेसबुकद्वारा Live बघू शकता.

*** पुढील निवेदनात सर्व वेळा भारतीय प्रमाणवेळेनुसार दिल्या आहेत याची नोंद घ्यावी. ***

- **Online स्वरूपयोग पुणे युवा केंद्र व U.S.A. केंद्र - महिन्यातील प्रत्येक रविवारी रात्री ८ ते ९.३०**

  अमेरिकेतील व भारतातील साधकांचे स्वाध्याय व त्यांवरील पूजनीय स्वामीजींचे मार्गदर्शन हेही आता Online माध्यमातून होतात. पूजनीय स्वामीजी या केंद्रात उपस्थित असतात. सर्व वयोगटांतील साधकांसाठी हे केंद्र खुले आहे.

- **Online स्वरूपयोग ध्यान केंद्र - सोमवार आणि बुधवार दुपारी ३.३० ते ५**

  श्री. चंद्रचूड बंगल्यात होणारे ध्यान केंद्र सध्या ऑनलाईन स्वरूपात होत आहे. त्याव्यतिरिक्त नेहमीप्रमाणे **पंधरवड्यातून एका बुधवारी सकाळी ६ ते ७.३०** या वेळातही ध्यान केंद्र होत आहे. ध्यान केंद्र zoom वरून प्रसारित होते (फेसबुकवर होत नाही), याची नोंद घ्यावी.

**अधिक माहितीसाठी संपर्क – सौ. स्वाती दामले ९९३०४७८०७३**

ही Online युवा केंद्रे Facebook द्वारा,
दिलेल्या वेळेत अथवा नंतरही, आपण पाहू शकता.
'Swaroopyog Pratishthan - Swami Madhavananda'
या Facebook Page वरून ही केंद्रे Live प्रसारित होतात.
केंद्र फेसबुक वरून कसे बघायचे याची माहिती पुढील link वरून आपल्याला मिळेल- https://bit.ly/2c3YUQ2

## सहज स्नेहसंबंध

पूजनीय श्रीरमण महर्षी एके दिवशी नेहमीप्रमाणे रमणाश्रमाच्या त्यांच्या कक्षात बसले होते. त्यांच्यासमोर काही साधक-भक्तही बसले होते आणि त्यांच्याशी महर्षी संवाद करत होते. तेव्हा नव्यानेच आलेला एक साधक हातात एका थाळीत फळं घेऊन ती महर्षींना अर्पण करावीत या उद्देशासह कक्षात येत होता. तेवढ्यात एका माकडाने अचानक येऊन त्या थाळीतली काही फळं उचलली आणि ते झपकन उड्या मारत निघून गेलं. बाहेर लोकांनी आरडाओरडा केला तेव्हा महर्षी म्हणाले, 'माकडाने त्याचा हिस्सा घेतलेला दिसतोय.' त्यावर सगळे हसले.

हे बोलणं चाललं होतं तेवढ्यात एक माकडीण पोटाशी पिलाला पकडून आली आणि फळांच्या टोपलीकडे जाऊ लागली. तिला आरडाओरडा करून लोकांनी पिटाळून लावलं. ते पाहून रमण महर्षी म्हणाले, 'अरे, ही पिलाची आई आहे. तिला काहीतरी द्या ना!' पण त्या गडबडीत ते काय म्हणाले ते साधक-सेवकांना नीट ऐकू गेलं नाही. माकडीणही घाबरून समोरच्या झाडामागे जाऊन लपली.

सगळे थोडे शांत झाल्यावर महर्षी म्हणाले, 'अरे, तो नर होता. दंडेली करून त्याने आपला वाटा घेतला. पण ही तर मादी आहे, शिवाय तिच्या पोटाशी पिलू आहे, असं म्हणून त्यांनी तिला बोलवायला सुरुवात केली. मध्ये एवढे लोक बसलेले, त्यात त्यांची भाषा तिला काय कळणार? पण महर्षींची वत्सलता तिच्यापर्यंत जाऊन पोचली. निर्भय होऊन ती माकडीण पिलासह महर्षींपुढे येऊन उभी राहिली. त्यांनी तिला हवी ती फळं देऊन तिची पाठवणी केली. महर्षींच्या देण्यात बापाच्या वात्सल्याची सहजता होती, तर माकडिणीत मुलीच्या घेण्यातली विश्वासपूर्ण सहजता होती.

महर्षींनी तिला बाहेर जाऊन बोलावलं नव्हतं. ते नेहमी बसत त्या कोचावर बसून त्यांच्याच भाषेत त्यांनी तिला बोलावलं होतं, पण त्यांच्या वात्सल्याची हाक तिच्यापर्यंत पोचली होती आणि ती ऐकून माकडीणही निर्भय-निःसंकोचपणे येऊन फळं घेऊन गेली होती. प्रसंग महर्षी आणि माकडिणीसाठी सहज होता, पण आपल्या दृष्टीने अलौकिक आहे.

# सरस रामायण

## सुंदरकाण्ड (लेखांक १०)

**(पूर्वसूत्र - श्रीराम वानरसेनेसह समुद्रतटी आले. त्यालगोलग झालेला प्रसंग म्हणजे, रावणाचा भाऊ बिभीषण त्याच्या चार मंत्र्यांसहित श्रीरामाला शरण आला. श्रीरामाने बिभीषणाला लंकेच्या राज्याचा अधिपती म्हणून राज्याभिषेक केला. त्याला दृढ आलिंगन देऊन आपला सखा केला.**

**बिभीषणाचे रामावर विलक्षण भक्तिप्रेम जडले होते. हनुमंत सीताशोधासाठी लंकेत गेला होता तेव्हा तो सूक्ष्म रूपाने बिभीषणाच्या सदनी गेला होता. लंकेतील त्या एकमेव सदनामध्ये अत्यंत सात्त्विक वातावरण आणि बिभीषण घेत असलेले रामनाम ऐकून मारुतीला आश्चर्य वाटले. त्याने बिभीषणाला भेटून आपली ओळख देण्यापूर्वी सूक्ष्म रूपातच राहून त्याला रामकथा गाऊन दाखवली होती. ती ऐकून अधिकच भक्तिभावभरित होऊन बिभीषणाने त्याला पाचारले होते. रावणाचा भाऊ जर रामाला येऊन मिळाला तर लंकायुद्धात त्याची खूप मदत होईल, असा मारुतीचा धूर्तपणा आणि बिभीषणाला रामकथा गाऊन दाखवणे, या दोन्ही गोष्टी धरून समर्थांनी मारुतिस्तोत्रामध्ये 'धूर्त वैष्णवगायका' असे गुणविशेष योजले आहेत. (काही ठिकाणी हा पाठ 'दूत' वैष्णवगायका असा आहे.) मारुतीच्या मनातील बिभीषण हा रामसखा व्हावा ही इच्छा सागरतटावर राम आणि बिभीषण यांच्या भेटीत प्रत्यक्षात आली होती. श्रीरामांनी दास मारुतीला जसे चिरंजीव केले, तसेच दास बिभीषणालाही चिरंजीव केले. यावरून मनाच्या श्लोकात, समर्थांनी म्हटले आहे, 'चिरंजीव केले जनीं दास दोन्ही। नुपेक्षी कदा रामदासाभिमानी।।')**

लंकेत असल्यापासूनच बिभीषणाचे रामावर भक्ति-प्रेम होते. मारुतीकडून रामकथा ऐकून तर त्याचे अंतःकरण राममयच होऊन गेले होते. रावणाच्या राजसभेत जेव्हा बिभीषणाने रावणाला 'श्रीरामप्रभूंना शरण जा' हा उपदेश केला, तेव्हा बिभीषणाला लाथ मारून हाकलून देताना 'रामाकडे चालता हो' असे रावणाने म्हटले होते. हीच रावणाची रामाकडे जाण्यासाठीची अनुज्ञा आहे असे बिभीषण समजला. रावणाने भर सभेत लाथ मारून केलेला हा अपमान नसून मोकळा करण्याची कृपाच रावणाने केली आहे, असा भाव बिभीषणाच्या मनी आला आणि त्याने रावणाला त्याबद्दल धन्यवाद दिले. प्रत्यक्ष रामभेटीमध्ये तर बिभीषण विरघळूनच गेला होता. श्रीरामांनी त्याला आलिंगन दिले, चिरंजीव केले, त्याबरोबरच 'वर माग' असे म्हटले तेव्हा बिभीषणाने 'तुझी अविचल भक्ती दे', एवढाच वर मागितला. तत्पूर्वी, बिभीषणाने रामाचे अत्यंत सुंदर स्तवन केले होते.

*नमस्ते राम राजेन्द्र नमः सीतामनोरम।*
*नमस्ते चन्दकोदण्ड नमस्ते भक्तवत्सल।।*

*(अध्यात्म रा. युद्धकांड ३.१७)*

या श्लोकाने सुरू झालेल्या स्तवनात रामाचे गुण, ईश्वरत्व, त्याचे तत्त्वस्वरूप हे सर्व प्रकट झाले आहे. ते ऐकून भक्तवत्सल रामांनी प्रसन्न होऊन 'तुझे कल्याण असो. पाहिजे तो वर माग' असे म्हटले होते. त्यावर बिभीषण उद्गारला-

*धन्योऽस्मि कृतकृत्योऽस्मि कृतकार्योऽस्मि राघव।*
*त्वत्पाददर्शनादेव विमुक्तोऽस्मि न संशयः।।*

*(अध्यात्म रा.युद्धकांड ३.३४)*

आणि त्याने अविचल विशुद्ध भक्तीचा वर मागितला. आता, बिभीषणाच्या अंतरात श्रीरामांसंबंधी सख्यभक्तीतील मोकळेपणा आला होता. हा सागर पार कसा करावा, हा प्रश्न श्रीरामांनी उपस्थित केला तेव्हा बिभीषणाने त्यांना स्मरण दिले, की 'जो सगर राजा सागर निर्माण होण्यास कारण झाला तो ईक्ष्वाकूवंशीय असल्याने तुमचा पूर्वज होता. तोच उपाय सुचवेल.' लक्ष्मण शीघ्रकोपी होता. तो म्हणाला, 'याऐवजी आपण बाणांनी सागर शुष्क करून टाकू.' त्यावर, राम म्हणाले, 'हो लक्ष्मणा, तू म्हटल्याप्रमाणेच करू पण थोडा धीर धर.'

श्रीरामांनी दोन्ही बाजूंना सांभाळण्याचे ठरवले आणि संध्यावंदन करून सागराची प्रार्थना करून सागराला प्रसन्न करण्यासाठी अनुष्ठान आरंभले.

## रावणाच्या गुप्तहेराचे व दूतांचे आगमन

रावणाकडे सर्वकाही शांत दिसत असले तरी तो स्वतः शांत नव्हता. त्याने शार्दूल नावाचा दैत्य गुप्तहेर समुद्रतटी पाठवला. त्याने ती वानरांची प्रचंड सेना पाहिली आणि परत जाऊन रावणाला सांगितले, 'महाराज, लंकेकडे वानर आणि अस्वले यांचा प्रचंड प्रवाहच जणू वाहत आला आहे. तो एखाद्या समुद्रासारखाच आहे. सर्व गोष्टी नीट कळून घेण्यासाठी तिकडे गुप्तहेर वा दूत पाठवा. त्यानंतर तुम्हाला योग्य वाटेल ते करा. सीतेला परत करा. ते करायचे नसल्यास सुग्रीवाला आपल्या बाजूला वळवून घ्या किंवा राम आणि सुग्रीवामध्ये फूट पाडा.'

शार्दूलाचे म्हणणे ऐकून रावण चिंताक्रांत झाला. त्याने शुक नावाच्या महादैत्याची दूत म्हणून योजना केली. (त्याच्याबरोबर सारण नावाचा दैत्यदेखील होता.) शुक पोपटाचे रूप धारण करून आकाशमार्गे उडत आला. त्याने ती सेना किती आहे हे मोजायचा प्रयत्न केला पण त्याला ती मोजता आली नाही. नंतर शुकाने (आणि सारणाने) वानरवेश धारण करून प्रत्यक्ष सेनेमध्ये शिरून सेनेचे निरीक्षण चालवले. पण थोड्याच वेळात बिभीषणाने त्यांना ओळखले. वानरांनी रावणाचे गुप्तहेर म्हणून त्यांना मारायला सुरुवात केली. तेव्हा शुक म्हणाला, 'आम्ही दूत आहोत. दूताला मारणे हा धर्म नाही.' तेव्हा बिभीषणाने वानरांना शांत केले. वानरांनी शुक-सारणांना बांधून रामापुढे नेऊन उभे केले. रामाने त्यांना बंधमुक्त करायला सांगितले आणि म्हटले, 'तुम्ही दूत आहात तर रावणाचा काय निरोप असेल तो सांगा.'

शुक म्हणाला, 'रावणाचा निरोप आहे, की मला देव, यक्ष हेदेखील पराभूत करू शकले नाहीत तर नर आणि वानर माझे काय करतील? सुग्रीवाला सांगितले आहे, की तू मोठ्या कुळातल्या वनचरांचा राजा आहेस. मी तुला भावाप्रमाणे मानत असून तुझ्या कोणत्याही गोष्टीचा नाश माझ्याकडून झाला नाही. मी सीता हरण करून आणली त्याचा तुझ्याशी काय सबंध? तू वानरांसह किष्किंधेला जा. देवांनाही लंका मिळवणे शक्य नाही. तिथे मानवांचे आणि वानर सेनापतीचे काय चालणार?'

श्रीराम शुकाला म्हणाले, 'काही पाहणी राहिली असली तर पाहून घ्या. बिभीषण तुम्हाला सर्व सेना दाखवेल. आपले जीवन जाईल ही भीती मनातून काढून टाका. तुम्ही शस्त्रहीन दूत आहात. तुम्हाला कोणी मारणार नाही.' प्रभू श्रीरामांच्या दर्शनाचा आणि त्यांच्या सौम्य, प्रेमळ वर्तनाचा शुक-सारणांवर एवढा प्रभाव पडला की, त्यांच्या मुखातून उद्गार आले, 'श्रीरामा, तुमचा विजय असो.'

शुक-सारण रावणाकडे परत गेले तेव्हा रावणाने विचारले, 'शुका, शत्रूकडून तुला खूप त्रास झाला का? तिकडची हकिकत काय ते सांग.' शुकाने रावणाला प्रणाम केला आणि सांगायला सुरुवात केली.

शुक म्हणाला, 'आम्ही वेश पालटून सैन्याची पाहणी करत होतो तेवढ्यात बिभीषणाने आम्हांला ओळखल्यावर वानरांनी मला ओरबाडायला व माझे लचके तोडायला सुरुवात केली. मला दोरीने बांधले. बिभीषणाने वानरांना शांत करून आम्हांला रामाच्या पायी आणून ठेवले. रावणाचे दूत म्हटल्या क्षणीच श्रीरामांनी आम्हांला बंधमुक्त करवले. वानरसेना पाहून मी भयभीत झालो. रामाचा निरोप आहे की, 'जे बळ वापरून तू सीतेचे हरण केलेस ते बळ तुझ्या सैन्य आणि बांधवांसह मला दाखव. मी सर्वांचा माझ्या शरांनी विध्वंस करीन. रावणा, धीर धरून राहा.' असे म्हणून श्रीराम शांत राहिले.'

यानंतर शुकाने आपले मत सांगायला सुरुवात केली. तो म्हणाला, 'महाराज, सीता रामाला परत करावी अथवा लवकर युद्धाला तयार व्हावे. पण हे लक्षात घ्या की वानर आणि अस्वलांची सेना अतिप्रचंड आहे. एकटा लंकेचा विध्वंस करू शकणारा हनुमंत तर त्यात आहेच पण असे कित्येक सामर्थ्यवान वीर त्या सैन्यात आहेत. राम, लक्ष्मण, सुग्रीव आणि बिभीषण हे चौघेच लंकेचा नाश करण्यास पुरे आहेत. फार काय, मी जे रामाचे बळ, स्वरूप आणि शस्त्रे पाहिली त्यांवरून तो एकटाच सर्व लंकेचा विनाश करण्यास समर्थ आहे.' हे सांगून झाल्यावर, शुकाने विविध देवांचे पुत्र वानररूपात कसे आहेत, त्यांचे सैन्य आणि सामर्थ्य किती आहे, ते रावणाला निवेदन केले.

यानंतर शुक म्हणाला, 'रामाच्या सामर्थ्याचे वर्णन करायला मी समर्थ नाही. श्रीरामरूपात प्रत्यक्ष परमेश्वर अवतरलेला असून सीता ही चित्‌शक्ती आहे. परमात्मस्वरूप

रामाचा आश्रय घे. त्याची भक्ती कर.' शुकाने बोलण्या-बोलण्यात आत्मस्वरूपाचे ज्ञान प्राप्त करून घेण्याचा उपदेशही केला होता. हे सर्व ऐकून रावण अत्यंत संतापला.

रावण क्रोधित होऊन म्हणाला, 'दुष्ट बुद्धीच्या शुका, तू चाकर असून गुरूसारखा उपदेश करत आहेस, याची तुला लाज कशी वाटत नाही? खरं तर मी तुझा वधच करायला हवा. पण तू पूर्वी माझ्यासाठी जे काम केले आहेस ते स्मरून मी तुला सोडून देतो. मूर्खा, येथून निघून जा.' यावर शुक म्हणाला, 'आपला हा माझ्यावर मोठा अनुग्रहच आहे' व तो निघून गेला.

## शुक कोण होता?

शुक हा पूर्वजन्मी आचारनिष्ठ ब्राह्मण होता. तो धर्मकृत्ये करत असे. देवांचा उत्कर्ष आणि दैत्यांच्या नाशासाठी त्याने अनेक यज्ञ केले होते. त्यामुळे राक्षस त्याच्या नाशासाठी टपलेले होते. एकदा शुकाच्या आश्रमात अगस्ती ऋषी आले. शुकाने त्यांना भोजन करून जाण्याची विनंती केली. ती स्वीकारून ते नदीवर स्नानासाठी गेले. ती संधी साधून वज्रदंष्ट्र नावाच्या राक्षसाने अगस्ती ऋषींचे रूप घेतले आणि शुकाकडे येऊन मांसाहार करण्याची इच्छा आहे असे त्याला सांगितले व तो राक्षस तिथून निघून गेला आणि गुप्त झाला. अगस्ती ऋषी परत आल्यावर जेवणात मांसाचे पदार्थ पाहून ते क्रोधित झाले आणि त्यांनी शुकाला 'राक्षस हो' हा शाप दिला तेव्हा शुकाने आश्चर्याने विचारले, 'हे मुनीश्वर, आपणच मला 'मांसाहार करण्याची इच्छा आहे' असे सांगितले आणि त्याबद्दल आता मला शाप का देत आहात?' तेव्हा अगस्ती मुनी डोळे मिटून शांत बसले आणि अंतर्ज्ञानाने त्यांनी तो सर्व प्रकार जाणला. मग त्यांनी डोळे उघडले व ते शुकाला म्हणाले, 'तुला मी अविचाराने शाप दिला हे खरे, पण या शापालाच वर आहे असे समज. तो असा की, ईश्वर रामरूपामध्ये अवतरेल. त्याची पत्नी सीता रावण हरण करेल. त्याच्या वधासाठी राम वानरसेना घेऊन समुद्राच्या तटी थांबेल तेव्हा रावणाचा दूत म्हणून तुला रामाकडे पाठवले जाईल व रामरूपातल्या ईश्वराचे तुला प्रत्यक्ष दर्शन होईल. रामाचा निरोप रावणाला सांगून तू त्याला त्याच्या हिताचा आणि त्याबरोबरच आत्मज्ञानाचा उपदेश करशील आणि त्यानंतर तुला तुझे मूळ स्वरूप प्राप्त होईल. ईश्वरदर्शनाने तू कृत्यकृत्य होशील.'

अगस्ती ऋषींच्या म्हणण्याप्रमाणे सर्वकाही झाले होते. शुक रावणापासून दूर गेल्यावर त्याला त्याचे मूळ स्वरूप प्राप्त झाले आणि रामरूप ईश्वरदर्शनाने त्याच्या सर्व तपाचे फळ त्याला मिळून, तो आपल्या आश्रमी गेला.

## राम आणि सागर

सागर येण्याच्या प्रतीक्षेत श्रीराम तीन दिवस अनुष्ठान करून राहिले होते, पण सागर काही दाद देत नव्हता. सागराकडून काहीच प्रतिसाद मिळेना म्हणून श्रीरामांनी क्रोधाचा अंगीकार केला आणि लक्ष्मणाला धनुष्य आणि महाभयंकर बाण आणायला सांगितले. रामाने धनुष्य थोडे वाकवून त्याला प्रत्यंचा चढवली तेव्हा जो टणत्कार झाला तोच मोठा विलक्षण होता. त्या धनुष्यावर श्रीरामांनी भयंकर अग्निबाण चढवला. तेजस्वी श्रीराम व हाती धनुष्यबाण हे आगळे रूप पाहून सर्व जण चपापले, भयकंपित झाले.

समुद्र ब्राह्मणरूपात आपल्या स्त्री-पुत्रांसह पूजेचे साहित्य घेऊन तत्काळ प्रकट झाला. ब्रह्मदेवाने निर्मित केलेला असा तो शुद्ध ब्राह्मण होता. त्या निजस्वरूपात येऊन त्याने रामाचे पूजन केले. 'रामा मी तुला शरण आलो आहे' असे समुद्र म्हणाला. तेव्हा श्रीरामांनी विचारले की, 'तीन दिवस मी अनुष्ठान करत राहिलो तेव्हा तू का आला नाहीस?' त्यावर समुद्राने उत्तर दिले की, 'तू इक्ष्वाकूवंशीय श्रेष्ठ पुरुष असून आणि सर्वशक्तिमान पूर्ण अवतार असून, अशक्ताप्रमाणे मला शरण आलास म्हणून मी क्षोभलो होतो. आता याचक भाव सोडून वीरवृत्तीसह तू धनुष्यबाण हाती घेतलेस- हे तुझे रूप पाहण्यासाठीच मी थांबलो होतो. ते तू घेतल्यावर तत्काळ आलो, कारण पूजासामग्री मी तयारच ठेवली होती.'

खरे पाहता, श्रेष्ठ पुरुषांनी दुसऱ्या श्रेष्ठांशी कसे वर्तन करावे या मर्यादेचा आदर्श घालून देण्यासाठीच, श्रीरामांनी समुद्राचे पूजन करून अनुष्ठान केले होते. स्वतःला अमर्याद समजणाऱ्या समुद्राला, श्रीरामांची ही मर्यादा समजण्यापलीकडची होती.

समुद्राने सांगितले, 'रामा, तुझा पिता दशरथ आणि मी, तारकासुराशी इंद्राच्या बाजूने युद्ध करायला गेलो होतो,

तेव्हा त्या दैत्याने माझा घात करण्याचीच वेळ आणली होती पण दशरथाने अतुल शौर्यासह रणकंदन करून मला वाचवले होते. हे त्याचे माझ्यावर ऋण आहे.'

दशरथाच्या युद्धकौशल्यावर प्रसन्न होऊन इंद्राने त्याला मुकुटमणी दिला होता. तो दशरथाने पुढे रामाला दिला, रामाने सीतेला दिला आणि सीतेने खूण पटवण्यासाठी तो हनुमंताला दिला.

सागर पुढे म्हणाला, 'रामा, तू ईश्वर आहेस म्हणून मी तुझ्या आज्ञेत आहे. तसेच दशरथाचे ऋण माझ्यावर आहे व तू इक्ष्वाकू वंशात अवतरला आहेस, ज्यातील सगर राजाने मला प्रकटवले आहे. या सर्व कारणांस्तव तुला ससैन्य परतीरी जाण्यासाठी मी साहाय्य करेन. माझे सांगणे असे आहे की सेतुबंध करावा. तुझ्या सैन्यात नळ वानर आहे, तो विश्वकर्म्याचा पुत्र आहे. त्याला पित्याकडून स्थापत्य कला आणि शास्त्र अवगत आहे. शिवाय त्याला ऋषींचा वरही आहे, तरी त्याच्याकरवी इथे सेतू बांधावा. त्या कामात जळचर किंवा लाटांमुळे विघ्न निर्माण होणार नाही. सर्व भाग शांत राहील हे मी पाहीन आणि या महत्कार्याला आतून साहाय्यभूत होऊन राहीन व पूल मी धारण करीन.'

श्रीरामांनी समुद्राच्या या कथनावर संतोष प्रकट करून मृदू मंजुळ वाणीने, जणू शब्दफुलांनीच समुद्राची पूजा केली. प्रत्यक्ष फुलांनी पूजन केले नाही कारण हाती धनुष्यबाण होते. त्यांनी सागराला विचारले की, 'हा बाण मी कोठे सोडू? कारण एकदा बाण धनुष्याला लावला की तो सोडणे क्रमप्राप्तच आहे.' तेव्हा समुद्राने सांगितले की उत्तर दिशेला द्रुमकुल्य नावाचा प्रदेश आहे. त्या प्रदेशात अत्यंत दुष्ट, पापी लोक राहत असून ते मला पीडा देत असतात. तरी तुझा बाण त्या प्रदेशावर मार.' श्रीरामांनी त्या प्रदेशावर बाण सोडला. त्याने तेथील पापी समाज दग्ध झाला. बाण श्रीरामांच्या भात्यात परत आला. तेव्हा प्रभू म्हणाले, 'जिथे बाण मारला तो प्रदेश शुष्क झाला तरी त्या मरूभूमीला मी वरदान देतो की ही भूमी पशूंसाठी हितकर ठरेल. इथे रोगांचे प्रमाण अत्यल्प राहील. ही भूमी फल, मूल आणि रसांनी संपन्न असेल. दुधाची रेलचेल असेल. स्निग्ध पदार्थ विपुल असतील. नाना प्रकारच्या औषधी सुगंध पसरून राहतील व या प्रदेशातील लोक संपन्न होतील.' (हा प्रदेश मारवाड म्हणून प्रसिद्ध आहे.) यानंतर श्रीरामांना अभिवादन करून समुद्र सहकुटुंब आपल्या स्थानी गेला.

यानंतर नळ वानर श्रीरामांपाशी आला आणि त्यांच्या चरणी वंदन करून तो बोलू लागला. नळ म्हणाला, 'मंदराचळावर विश्वकर्म्याने माझ्या मातेला असा वर दिला होता की 'देवी तुला माझ्यासारखा पुत्र होईल.' मी शिल्पकर्मात त्याच्यासारखाच आहे. विचारल्याशिवाय आपले गुण कसे सांगावेत म्हणून मी गप्प होतो.' नळ वानर लहानपणापासून अत्यंत बलवान होता. तो खेळात मजा म्हणून काहीही वस्तू पाण्यात बुडवून टाकत असे. तो ऋषिसमूहाच्या सन्निध राहत असे आणि त्यांना यज्ञासाठी लागणाऱ्या वस्तू, यज्ञपात्रे पाण्यात बुडवून टाकत असे. यामुळे ऋषींची गैरसोय होत असे. अशाच एका प्रसंगी ऋषींनी नळाला शाप दिला की 'तू पाण्यात टाकलेल्या वस्तू बुडणार नाहीत.' हा शापच सेतुबंधासाठी वर ठरणार होता. नळाने पाण्यात टाकलेले दगड तरणार होते. नळ श्रीरामांना म्हणाला, 'मी सागरावर सेतू बांधण्यास समर्थ आहे. त्यासाठी आपण अनुज्ञा द्यावी अशी प्रार्थना आहे.' हे नम्र पण आत्मविश्वासाचे बोलणे ऐकून श्रीराम प्रसन्न झाले. त्यांनी नळाला आशीर्वाद दिले आणि 'सर्व सैन्याने नळाच्या नेतृत्वाखाली सागरावर पूल बांधण्यास सुरुवात करावी' असा सर्वांना आदेश दिला. प्रभू रामचंद्रांनी आपल्या मुखाने 'सेतुबंध करावा' हा उच्चार केला तोच मुहूर्त असे धरून लगेच 'सियावर रामचंद्र की जय' या घोषासह त्या महत्कार्याचा प्रारंभ झाला.

(क्रमशः)


## आजीवन सदस्यत्व घेण्यासाठी आवाहन

**'स्वरूपयोग' त्रैमासिकाचे आजीवन सदस्यत्व केवळ ₹ २५००/- आहे. या निवेदनाद्वारे सर्व वाचकांस हे आवाहन करत आहोत, की ज्यांनी अजून आजीवन सदस्यत्व घेतलेले नसेल त्यांनी लवकरात लवकर हे सदस्यत्व अवश्य घ्यावे.**

# श्रीमत् दासबोध स्वाध्याय

## अर्चनभक्ती, दशक ४, समास ५, लेखांक २

समर्थांनी असं म्हटलं आहे, की

***काया वाचा आणी मनें। चित्तें वित्तें जीवें प्राणें।***
***सद्भावें भगवंत आर्चनें। या नाव आर्चनभक्ती॥२१॥***

आपल्याकडे जी काही साधनं आहेत, त्यांमध्ये शरीर हे साधन आहे, वाचा हे साधन आहे. प्रत्येक साधनाने मी ईश्वराप्रीत्यर्थ जे जे काही करीन त्या सगळ्यातून त्याची पूजा होते. म्हणजे शरीराने गंध–फूल वाहणं हा भाग झालाच, पण पूजेच्या वेळी वाचेने स्तोत्र म्हणणं, नामस्मरण करणं हाही पूजेचाच भाग आहे. अंतःकरण देवाशी संबधित ठेवणं, आपल्या संपत्तीच्या माध्यमातून काही धन निःस्वार्थपणे इतरांसाठी, सत्कार्यासाठी उपयोगात आणणं हेही पूजनच आहे. याचा अर्थ हा, की जगातलं चांगलं वाढावं यासाठी जो जो प्रयत्न केलेला असेल, तो तो परमेश्वराच्या पूजनाचाच एक भाग आहे.

प्रत्यक्ष पूजाविधान करत असताना प्रथम आपण ही भूमिका ठेवली पाहिजे की हे आपण आपल्या स्वतःसाठी करतो आहोत. बऱ्याच वेळेला देवाचं आपण काही करत नाही अशी एक अपराधीपणाची भावना असते. जे लोक देवाचं करतात त्यांची, आपण देवाचं किती करतो ही भावना असते. या दोन्ही भावना अज्ञानातून आलेल्या आहेत, कारण आपण देवाचं काही करणं किंवा न करणं असं नसून देवच आपलं करतो अशी भावना असली पाहिजे. देवाचं आपण काय करणार? खऱ्या भक्तीची भावना म्हणजे तोच सर्वकाही आहे, सगळं काही त्याचंच आहे आणि त्याची इच्छा ती माझी इच्छा! त्यामुळे अर्चन हा केवळ शास्त्रीय क्रियाप्रकार नसून ती भक्ती आहे. मी माझी भावना प्रकट करतो आहे. शुद्ध भूमिका असावी. पूजेची सुरुवात केव्हापासून करावी? तर सकाळी उठल्यापासून पूजा सुरू व्हायला पाहिजे. म्हणजे जर कुणाला काही खरंच समजून घ्यायचं असेल, तर तत्त्व असं आहे की अर्पण करायचं असलं तर सगळ्या गोष्टींतला अग्रभाग देवाला अर्पण करायचा असतो. अग्रभाग म्हणजे काय, तर पहिली गोष्ट. मी जर प्रयत्नपूर्वक पहिल्यांदा परमेश्वराचं स्मरण करण्याचा प्रघात ठेवला, तर त्याची पहिल्यांदा आठवण येणं हा मनाचा स्वभाव होऊन जातो. अशा रीतीने पहिला येणारा विचार भगवंताला येऊन पोचेल. मला प्रथम भगवंताची प्रतिमा दिसेल, माझं पूज्य दैवत प्रथम माझ्या दृष्टीला येईल, अशीच योजना करावी. त्यानंतर, मुखशुद्धी केल्यावर जो पहिला शब्द मी उच्चारीन ते ईश्वराचं नाम असेल, तो मंत्र असेल. मी ॐ म्हणेन, हरिः ॐ म्हणेन आणि मग पुढचं आवरायला सुरुवात करीन. या नाममंत्राने ईश्वराचं स्मरण करून स्नानापर्यंत माझं स्वतःचं आवरत असताना मी मनामध्ये नामस्मरण करीन. संत कबीरांनी म्हटलं आहे,

तन पवित्र सेवा करे। धन पवित्र दिये दान।
मन पवित्र हरिभजन से। इसविध हो कल्याण॥

त्यामुळे परमेश्वराच्या नामस्मरणामध्ये जर मी सगळी कर्मं करीन, तर मी स्वतःला पूजेसाठी तयार करत असतो. अगदी सकाळी चहा पायल्याशिवाय माझं होतच नाही असं बऱ्याच जणांचं होत असतं, तर चहाला दूध घालण्याआधी, माझी नैवेद्याची वाटी त्यात साखर घालून तयार असेल. माझ्यासाठी मी कुठलाही भाग स्वीकारण्याआधी भगवंताला अर्पण करण्यासाठी सोय करून ठेवली असेल तर ते सहज करता येतं. परंतु अशी तयारी मी केलेली नसते आणि ती तयारी केलेली नसल्यामुळे आपलं गडबडीत काहीतरी होत जातं. मी जे ग्रहण करणार आहे त्याचा अग्रभाग अर्पण करायचा असेल, तर अगदी सकाळपासूनच त्याला अर्पण करावं. मी पाणी पीत असताना त्याला अर्पण कसं करणार? तर मनातल्या मनात त्याच्या स्मरणामध्ये पहिला घोट घेईन, असं ठरवून जर केलं तर त्याला अर्पण होतं. जे जे काही माझं पहिलं आहे ते अर्पण करीन अशी स्वतःला सवय लावावी. एखादं नवीन पेन आलं, की ते बरोबर चालतंय की नाही हे पाहण्यासाठी माणसं काहीतरी गिरवतात, शून्य काढतात, त्यापेक्षा ॐ काढावा. मी जो पहिला शब्द लिहीन ते परमेश्वराचं नाम असेल. त्यानंतर जे काही लिहीन तो माझ्या व्यवहाराचा भाग असेल.

### संतजीवनप्रसंग

अग्र अर्पण करणं हे अंगामध्ये किती मुरू शकतं याबद्दल

एक प्रसंग आहे. कलावतीदेवींचं एका ठिकाणी प्रवचन झालं, आणि त्यानंतर त्यांना चहा आणून दिला, तर त्याच्याकडे बघितल्याबरोबर त्या म्हणाल्या की 'हा चहा नको मला.' त्या बाईंनी विचारलं की 'तुम्हाला का नको चहा?' तर त्या म्हणाल्या, 'त्याच्यामध्ये साय पडलेली आहे.' 'साय तुम्हाला आवडत नाही का? गाळून देते.' 'नाही, साय पडलेली आवडत नाही असं नाही, पण जिच्या हातून साय पडली तिचं, साय पडल्याबरोबर 'अरेरे (साय गेली)' हेही पडलेलं आहे.' 'तर त्यामुळे तुम्हाला ग्रहण करण्यात काय अडचण आहे?' 'जे जे मी ग्रहण करते, चहा पिते किंवा काहीही घेते ते मी मनोमन पहिल्यांदा कृष्णाला अर्पण करत असते, आणि दुसऱ्या कुणाची वासना त्याच्यामध्ये अडकून पडलेली असताना ते मला त्याला अर्पण करता येणार नाही आणि मलाही घेता येणार नाही.' इतक्या सखोल भूमिकेमध्ये ही संतमंडळी वावरत असतात. बाह्यतः दिसताना ते कर्म इतरांसारखंच साधं असतं, परंतु अंतःकरण परिपूर्ण रीतीने परमेश्वराशी जोडलेलं असतं.

पूजेसाठी फुलं वगैरे जे साहित्य असतं– स्वतः जर फुलं काढणार असू तर त्या वनस्पतीला प्रार्थना करून फूल मागावं असा विधी आहे. 'भगवंताच्या पूजेसाठी हवं आहे. हे गुलाबा, तुझं हे पुष्प दे' असं मोठ्याने म्हणण्याची गरज नाही, पण ते मनोमन मागावं. त्यानंतर ते पुष्प घ्यावं. तुळस, दूर्वा वगैरे जे पूजासाहित्य तुम्ही घेतलेलं असेल, त्यावर आदल्या दिवशी देवघरामध्ये ठेवलेल्या पाण्यातलं, पूजेत शंख असेल तर त्या शंखातलं थोडंसं पाणी ईश्वरस्मरणपूर्वक शिंपडावं. त्यानंतर नाम घेत पूजास्थानी आजूबाजूला शिंपडावं. तो भाग स्वच्छ–पवित्र करून घ्यावा. नैवेद्याचं दूध, पूजेसाठीचं साहित्य, जल इत्यादी जे पूजास्थानावर न्यायचं आहे, ते वाटेत जमिनीवर कुठेही ठेवू नये. ते पूजास्थानापाशीच गेलं पाहिजे. पहिल्यांदा नामस्मरणाने पूजेची सुरुवात करायची. परमेश्वराला नमस्कार करून, 'माझी पूजा तू स्वीकार कर' अशी प्रार्थना करून, मग पूजेला सुरुवात करायची. सोपं आहे, त्याच्यासाठी विशिष्ट मंत्र यायला पाहिजे असं नाही. तुमच्या भाषेमध्ये बोला.

पूजेच्या वेळी, स्नान–संध्येच्या वेळी आमच्या अंतःकरणामध्ये अत्यंत ऋजुता यावी यासाठी ही विधाने आहेत. स्वतःची शुद्धी करून म्हणजे नामस्मरणासह स्नान करून, पूजेला सुरुवात करण्यापूर्वी देवघरासमोर बसायचं. प्रथम नमस्कार करून प्रार्थना करायची, की 'देवा, माझी पूजा स्वीकार कर!' मग आचमनं– 'ॐ केशवाय नमः। ॐ नारायणाय नमः। ॐ माधवाय नमः। ॐ गोविंदाय नमः।' एवढी चार नावं घेऊन गायत्री मंत्र उच्चारतात. पूजेत अंतःकरण सौम्य करणारे विधी असतात. मार्जन म्हणून एक विधी असतो– शुद्धीकरणासाठी थोडं जल आपल्या डोक्यावर शिंपडायचं. ते शिंपडत असताना बोटं त्या जलावर अशा प्रकारे ठेवावीत की त्या जलाला आपली नखं लागणार नाहीत. आता पाहा, हा कितीतरी नाजूक भाग आहे– पूजा आम्हांला ऋजुता शिकवते. देवांच्या प्रतिमा आम्ही बाहेर काढू, त्या वेळी प्रत्येक देवाला आदराने, सौम्यपणे ताम्हनामध्ये ठेवायचं असतं.

## संतजीवनप्रसंग

गुलाबराव महाराज प्रज्ञाचक्षू होते (लौकिक भाषेत ते अंध होते). त्यांनी एकदा लक्ष्मणबुवा पांगारकरांना सांगितलं की 'आज तू पूजा कर.' त्यांनी पूजा करताना ताम्हनात कृष्णाची मूर्ती ठेवताना थोडासा आवाज झाला. तेव्हा गुलाबराव महाराजांचं अंग शहारलं, थरथरलं. ते उद्गारले, 'अरे काय करतोयस? मूर्ती अशी ठेवायची नसते. अलगदपणे ठेवायची असते. तिचा आवाज होता कामा नये.'

पूजेच्या वेळी सगळ्या घराची ती पूजा आहे अशी भूमिका असावी. एका बाजूला टीव्ही लावला आहे, एका बाजूला पूजा चाललेली आहे, अशा प्रकारची पूजा नसावी. हे सगळ्या घराचं मिळून पूजन आहे, या भूमिकेतून पूजन असायला पाहिजे. आणि इतरांच्या मनात असा भाव नसेल तर मी माझी वेळ अशी निवडली पाहिजे, की त्या वेळेला इतरांचा विक्षेप त्यामध्ये येणार नाही. अगदी शांतपणाने करायचा हा विधी आहे. माझा आणि परमेश्वराचा संबंध माझा मलाच पूजेत प्रतीत होत असतो. घिसाडघाईने कसातरी करून टाकायचा हा विधीच नाही. देवघर पुसण्याचं वस्त्र वेगळं, प्रतिमांच्या चौकटी पुसायचं वस्त्र वेगळं, तसंच देवांना स्नान घातल्यानंतर देव पुसण्याचं वस्त्र वेगळं असलं पाहिजे. नाही तर एकाच कापडाने इकडेतिकडे बोळा फिरवायचा, याने आपल्या भावनेवरही बोळा फिरतो.

देवाची प्रतिमा, मूर्ती हातात घेताना ती नाजूकपणाने परंतु सावधपणे, पडणार नाही, हलणार नाही अशा रीतीने घ्यावी. गंध उगाळत असताना त्यात नामस्मरण मिसळलेलं असलं पाहिजे.

इकडेतिकडे लक्ष आहे, कसंतरी गंध उगाळत आहे, कुणाशीतरी बोलत आहे, ती पूजा नव्हे. समजा, मी गंध उगाळत नाही, अष्टगंध लावतो आहे, त्यामध्ये पाणी घालतो आहे– ते करत असताना माझं मन त्या ठिकाणी असलं पाहिजे. अनामिकेने गंध प्रतिमेच्या कपाळी बरोबर मध्याशी जर तुम्ही नीटपणाने लावलं, तर आपल्या कपाळमध्यात (स्पंदनात्मक) जाणीव होते. नाही तर फसकन देवाच्या डोक्याला गंध लावलं जातं. ते नीटपणे उगाळलेलं नसलं, पुरेसं घट्ट नसलं, पातळ असलं की मग जणू देवाच्या डोळ्यांतून पाणी वाहतं आहे, त्या पूजेमुळे देव रडतो आहे की काय असं वाटायला लागतं. अशा प्रकारची कशीतरी पूजा करून टाकण्यात काय समाधान वाटणार? सात्त्विकता असायला पाहिजे. देवमूर्ती ज्या वेळेला पुन्हा देवघरात ठेवतो, त्या वेळेला तितक्याच आदराने, शांतपणाने ती ठेवली पाहिजे. हे सगळं आपल्यासाठी ऋजुतेचं शिक्षण आहे.

ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटलं आहे, की पूजुनि देवो पाहावा। ते देव केव्हातरी, कसेतरीच पूजलेले असतील तर त्यांच्याकडे पाहवतही नाही. असं करू नाही. जी फुलं देवाला वाहिलेली असतात, ती अशा पद्धतीने नीट वाहावीत, की ती आपल्याकडे प्रसन्नतेने पाहत हसत आहेत असं वाटावं. म्हणजे ती आम्हीच पाहणार आहोत.

देव आमच्या चेहऱ्याकडे पाहतो आहे, पण आमचं लक्ष कुठे आहे? पूजा–उपासना अंतःकरणामध्ये एकाग्रता आणि देवाच्या अस्तित्वाच्या भावासह मार्दव निर्माण करते.

(क्रमशः)

....❀....

**१ ऑक्टोबर २०२० ते १५ जानेवारी २०२१**
**या काळात स्वरूपयोग कार्यालय**
**खालील दिवशी बंद राहील**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | शनिवार | दि. १४ नोव्हेंबर | दिवाळी |
| २. | सोमवार | दि. १६ नोव्हेंबर | दिवाळी |
| ३. | शुक्रवार | दि. २५ डिसेंबर | नाताळ |
| ४. | गुरुवार | दि. १४ जानेवारी | मकरसंक्रांत |

## भारतात राहणाऱ्यांसाठी (Indian Residents)
## ऑनलाईन वर्गणी/देणगी सुविधा

**स्वरूपयोगच्या सर्व वाचक, साधक व देणगीदारांसाठी महत्त्वाचे निवेदन**

**आता वार्तापत्र वर्गणी (subscription) किंवा स्वरूपयोगला देणगी Online पद्धतीने अगदी mobile वरूनही सहज देऊ शकता.**

**Rupay Debit Card, Net-Banking, Paytm, Mobile Wallets, UPI वगैरे अनेक पद्धतींनी भारतीय चलनात (Indian Rupees) online payment करण्याची सोय आता उपलब्ध आहे.**

: वार्तापत्र वर्गणी (subscription) :

**https://www.swaroopyog.net/App/subscription.php**

: देणगी (Donation) :

**https://www.swaroopyog.net/App/Donation.php**

**स्वरूपयोगची Website (https://www.swaroopyog.net व swaroopyog.org) आणि स्वरूपयोगचे Facebook page : Swaroopyog Pratishthan-Swami Madhavananda येथेही वरील links सहज मिळू शकतील.**

**ही Online Payment सुविधा भारतात राहणाऱ्या भारतीय नागरिकांसाठी उपलब्ध आहे. तसेच, परदेशात राहणाऱ्या भारतीय पासपोर्टधारक (Indian Passport Holders) व्यक्तींसाठीही या सुविधेद्वारा भारतीय चलनात देणगी देण्याची सोय आता उपलब्ध आहे.**

**NEFT/RTGS द्वारे बँकेतील खात्यात परस्पर देणगी जमा करणाऱ्या देणगीदारांनी कृपया खालील माहिती ई–मेलवरून पाठवावी ही विनंती.**

**१. पूर्ण नाव व पत्ता २. देणगी रक्कम ३. नेफ्टचा दिनांक ४. नेफ्ट रेफरन्स क्र. ५. पॅन क्र.**

देणगीदारांसाठी आवश्यक माहिती

**A/c Name – Swaroopyog Pratishthan**
**Bank – State Bank of India**
**Savings A/c No. 30350741901**
**Branch – Deccan Gymkhana, Pune**
**IFSC code – SBIN0001110**
**MICR code – 411002003**

**देणगी पाठवल्यावर सौ. जयश्री कुलकर्णी यांना ०२०–२५६५२४५७/९४२०३१८६३४ या क्रमांकांवर किंवा WhatsApp अथवा swaroopyog@gmail.com वर कळवावे.**

# श्रीमत् भागवत स्कंध ९

## भगवद्भक्त अंबरीशाची कथा

भागवताच्या आठव्या स्कंधाच्या अखेरीस मत्स्यावताराची आणि सत्यव्रत राजाला ब्रह्मज्ञानाची प्राप्ती झाल्याची कथा आली आहे. त्या कल्पाच्या अखेरचा तो प्रसंग होता. पुढच्या कल्पात, सत्यव्रत विवस्वान म्हणजे सूर्याचा पुत्र मनू झाला. या मनूला १० पुत्र झाले. त्यांतील ज्येष्ठ पुत्र इक्ष्वाकू याच्या वंशातच श्रीरामप्रभू अवतरले. या पुत्रांपैकी, नवव्या पुत्राचे नाव नभग असे होते. त्याला नाभाग नावाचा एक पुत्र होता. तो ब्रह्मचर्य स्वीकारून विद्या प्राप्त करून घेण्यासाठी गुरुगृही राहिला होता, तेव्हा त्याच्या भावांनी त्याची सर्व संपत्ती आपापसांत वाटून घेतली. नाभाग विद्याभ्यास पूर्ण करून घरी परतला व आपला वाटा मागू लागला, तेव्हा त्याच्या भावांनी सांगितले, की 'आम्ही तुझ्यासाठी आपले पिता राखून ठेवले आहेत.' नाभाग अत्यंत सरळ हृदयी होता. आपले भाऊ आपल्याला फसवत आहेत, असे त्याच्या मनातही आले नाही.

नाभाग आपल्या पित्याकडे गेला. पित्याला त्याच्या सरळ हृदयाचे कौतुक वाटले. त्याने त्याला निर्वाहाचे एक साधन सांगितले. तो म्हणाला, की 'अंगिरस ऋषी एक सत्र करत आहेत. त्यांना मदत करण्यासाठी, मी सांगतो ती विश्वेदेवांची दोन सूक्ते तू त्यांना सांग, म्हणजे कर्म समाप्त झाल्यावर यज्ञातील शिल्लक राहिलेले सर्व द्रव्य ते तुला देतील.'

नाभाग अंगिरस ऋषींच्या यज्ञसत्रात गेला. त्याने त्यांना ती दोन सूक्ते शिकवली. त्याचा त्यांना खूप उपयोग झाला, म्हणून यज्ञ संपल्यावर उर्वरित सर्व द्रव्य नाभागाला देऊन ते निघून गेले. नाभाग ते द्रव्य घेत असताना, भगवान रुद्र तिथे आले, आणि 'हे द्रव्य माझे आहे' असे ते म्हणाले. नाभाग आपल्या पित्याकडे गेला आणि त्याने हे आपल्या पित्याला सांगितले. तेव्हा नभग राजा म्हणाला, की 'यज्ञमंडपातील उर्वरित सर्व द्रव्यावर, इतकेच काय पण सर्वच पदार्थांवर रुद्राचे स्वामित्व आहे.' हे ऐकून नाभाग रुद्राकडे आला आणि म्हणाला, 'हे सर्व द्रव्य तुझेच आहे, ते तू घे आणि माझ्या अपराधाबद्दल मला क्षमा कर.'

रुद्र नाभागावर व त्याच्या पित्यावर प्रसन्न झाला. त्याने सर्व द्रव्य तर नाभागाला दिलेच, पण त्याला ब्रह्मज्ञानही दिले. अशा सरळहृदयी, ज्ञानसंपन्न नाभागाच्या पोटी महान भगवद्‌भक्त पुत्र अंबरीश जन्माला आला. अंबरीशावर लहानपणापासून भक्ती-ज्ञानाचे संस्कार झाले होते. सर्वोत्कृष्ट राज्यवैभव त्याला प्राप्त झाले. असे असूनही तो अत्यंत विरक्त असा भगवद्‌भक्त होता. त्याने आपले सर्व शरीर-वाचा-मानस भगवद्‌भक्तीला वाहिले होते. तो सर्व कर्मे ईश्वरार्पण बुद्धीने करत असे. एकादशीचे व्रत अंबरीश राजा नियमाने यथाविधी करत असे. प्रत्येक एकादशीला तो दिवसभर उपवास करून रात्री जागरण आणि हरिकीर्तन करत असे आणि द्वादशीच्या दिवशी पाच घटका दिवस आल्यावर पारणे करून व्रत पूर्ण करत असे.

### एकादशी व्रताचे माहात्म्य सांगणारी कथा

सूर्यवंशात रुक्मांगद नावाचा विख्यात विष्णुभक्त राजा होऊन गेला. विष्णुपूजेसाठी त्याने अत्यंत सुंदर अशा फुलांची मोठी बाग लावली होती. रोज प्रभातकाळी राजा स्नान-संध्या करून त्या बागेतील सुंदर फुलांनी विष्णुपूजा करत असे. एके दिवशी हे वृत्त नारदांनी इंद्राला सांगितले. तेव्हा रुक्मांगद राजाच्या बागेतली फुले घेऊन येण्यासाठी इंद्राने विमानातून दूत पाठवले. त्यांनी आणलेल्या फुलांचे सौंदर्य पाहून इंद्राला आश्चर्य वाटले आणि त्याने दूतांना रोज फुलं घेऊन येण्याची आज्ञा केली.

इकडे रुक्मांगद राजाला पूजेसाठी फुलं कमी पडू लागली म्हणून त्याने सेवकांजवळ चौकशी केली. तेव्हा बागेतल्या सेवकांनी सांगितलं की चोर विमानातून येऊन फुलं घेऊन जातात. राजाला हेही कळलं की विमानाखाली वांग्याच्या लाकडांचा धूर केला, तर विमान उडू शकत नाही. तेव्हा दुसऱ्या दिवशी त्याने ती व्यवस्था करायला सांगितली. इंद्रदूत फुलं गोळा करून विमानात बसले, पण वांग्याच्या लाकडांच्या धुराने ते विमान उडेना. तेव्हा राजाच्या सेवकांनी इंद्रदूतांना राजापुढे आणून उभे केले.

राजाने त्यांना विचारले, की 'तुम्ही कोण आहात? आणि फुलं का नेत असता?' तेव्हा इंद्रदूतांनी सर्व हकिकत सांगितली. आपल्या बागेतली फुलं प्रत्यक्ष देवांना अर्पण केली जात आहेत हे ऐकून राजाला आनंद झाला आणि त्याने 'देवांच्या सेवेसाठी हवी तेवढी फुले नेत जा' असे इंद्रदूतांना सांगितले. 'विमान उडू शकत नाही, पण काल कोणा व्यक्तीने एकादशीचा उपवास

केला असेल तर तिने विमानाला स्पर्श केल्यावर त्या व्यक्तीच्या पुण्यप्रभावाने ते उडेल' असे इंद्रदूतांनी राजाला सांगितले. एकादशी व्रताबद्दल राजाला किंवा त्याच्या राज्यात कोणाला माहीत नव्हतं. संपूर्ण दिवस उपवास करून ईश्वरस्मरणात घालवण्यामुळे पुण्यप्रभाव निर्माण होतो. पण 'व्रताबद्दल काही माहीत नसूनही नुसता उपवास जरी कोणी केला असेल तरी चालेल' असे इंद्रदूतांनी सांगितले. एका बाईला असा उपवास घडला होता. तिने स्पर्श करताच विमान चालू झाले. रुक्मांगद राजाने व्रताचा पूर्ण विधी दूतांकडून जाणून घेतला होताच. त्यानुसार तो मोठ्या भक्तिभावाने एकादशीचे व्रत नित्यनियमाने करू लागला.

खरे पाहता, भक्तिभावाने ईश्वरस्मरणात राहणे हा मुख्य विधी आहे. उपवासाचा परिणाम असा, की आज व्रत आहे म्हणून ईश्वरस्मरणात राहायचे आहे, याचे स्मरण राहते. आता या व्रताचा एवढा विपर्यास झाला आहे, की निरनिराळे उपवासाचे पदार्थ कौतुकाने करून खाणे हा मुख्य भाग झाल्याने 'एकादशी आणि दुप्पट खाशी!' अशी म्हणच होऊन गेली आहे. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचा 'निर्जळी एकादशी' हा विनोदी लेख वाचण्यासारखा आहे. त्यांचे पांडूतात्या सकाळीच मंडईत उपवासाच्या भाज्या वगैरे आणण्यासाठी जात आणि शेंगांतील दाणे खात खातच घरी येत. मग इतके विविध पदार्थ खाऊन त्यांचं पोट इतकं तुडुंब भरत असे की त्यात पाणी जायलादेखील जागा राहत नसे अशी त्यांची 'निर्जळी' एकादशी होत असे. मूळ उद्देश मात्र ईश्वरस्मरणात रंगून जाणे हा आहे.

अंबरीश राजा असाच भक्तिप्रेमात रंगून एकादशी करत असे. एकदा रात्री हरिकीर्तन करून, द्वादशीला पूजा करून, कोणी अतिथी अभ्यागत आहे का म्हणून राजाने पाहिले, तर दुर्वास ऋषी त्याच्या दृष्टीस पडले. राजाने त्यांना पारण्यासाठी प्रसाद भोजनाला यावे अशी विनंती केली आणि त्यांनीही ती मान्य केली. 'फक्त यमुनेवर जाऊन स्नान करून येतो' असे सांगितले. तिकडे यमुनेवर स्नान झाल्यावर तर्पण, देवतार्चन वगैरे विधी करत राहिले आणि राजाची पारण्याची वेळ टळून जाऊ लागली.

आमंत्रित अतिथीवाचून अंबरीश राजा अन्नग्रहण करणे शक्यच नव्हते. नैवेद्य समर्पण न करावा आणि उपवास न सोडावा तर व्रतभंग होतो. तेव्हा पुरोहिताने राजाला सांगितले, की पूजेतील शालिग्रामाचे तीर्थ घ्यावे. त्याप्रमाणे राजाने शालिग्रामाचे तीर्थ घेऊन व्रताची सांगता केली. दुर्वास ऋषी त्यानंतर काही वेळाने परतले. ते महातपस्वी असल्याने राजाने पारण्याच्या वेळी तीर्थ घेतले हे त्यांना कळले. आधीच कोपिष्ट, त्यात भूक लागलेली आणि राजाने अवमान केला असे मानून क्रोधाविष्ट झालेल्या दुर्वास ऋषींचे अंग थरथर कापू लागले. त्यांनी राजाला 'मदाने अंध झालेला, उन्मत्त' अशी दूषणे देऊन 'दहा जन्म घेशील' असा शाप दिला. तेव्हा तिथे भगवान श्रीविष्णू प्रकट झाले आणि त्यांनी अंबरीशाला अभय देत म्हटले, 'तुझे दहा जन्म मी सोशीन. समर्थांनी या प्रसंगाला धरून म्हटले आहे, 'बहू श्रापिता कष्टला अंबऋषी। तयाकारणे श्रीहरी जन्म सोशी।'

भगवान विष्णूंनी अंबरीश राजाला प्रत्यक्ष दर्शन दिले हे त्याच्या व्रताचे आणि सहनशीलतेचे मोठेच फळ त्याला प्राप्त झाले. हरिदर्शनाने तो कृतकृत्य झाला, तृप्त झाला, पण दुर्वासांचा मात्र क्रोध अजूनच भडकला. त्यांनी आपली एक जटा उपटून ती आपटली. त्यातून एक कृत्या निर्माण झाली. ती राजाचा नाश करण्यासाठी राजावर सोडली. इतक्यात भगवान विष्णूंनी सुदर्शनचक्राच्या ठायी अग्नीची योजना करून, ते चक्र दुर्वासांच्या जटेवर सोडले आणि त्या कृत्येचा नाश केला. एवढ्यावर ते चक्र थांबले नाही. ते अग्नियुक्त सुदर्शनचक्र दुर्वासांच्या मागे लागले. त्याच्या भीतीने ऋषी पळू लागले. ते ब्रह्मदेव, शंकर यांच्याकडे गेले, पण त्यांनी त्यांना भगवान विष्णूंकडे जायला सांगितले. विष्णू म्हणाले, 'मी भक्तांच्या अधीन असतो, तू अंबरीश राजाकडे जा.' दुर्वास अतिशय थकून गेले होते. ते कसेबसे अंबरीश राजाकडे गेले. त्यांनी त्याची क्षमा मागितली आणि चक्राचे निवारण करण्याची प्रार्थना केली. हे करताना ते त्याच्या पायांवर पडले होते.

अंबरीशाने ऋषींना उठवून योग्य आसनावर बसवले. त्यांच्या चरणावर मस्तक ठेवून त्यांची विधियुक्त पूजा केली. श्रीभगवानांच्या चक्राला राजाने नमस्कार करून 'दुर्वासांना सोड' अशी त्याची प्रार्थना केली, तेव्हा ते चक्र नाहीसे झाले. चक्राच्या अग्नीच्या तापापासून दुर्वास मुक्त झाले. मग अंबरीश राजाने दुर्वासांना भोजनाला बसवून त्यांची क्षुधा शांत केली व त्यांचा योग्य सत्कार केला. दुर्वास ऋषी अत्यंत संतुष्ट झाले. ते म्हणाले, 'राजा, मी तुझा अतिशय छळ केला. त्याबद्दल मला क्षमा कर. ऊस पिळला तरी त्यातून गोड रस निघतो. चंदन घासले तरी त्यातून परिमळ निघतो त्याप्रमाणे तुझे वागणे होते. महान भगवद्‌भक्त म्हणून तुझी कीर्ती चंद्र-सूर्य असेपर्यंत जगात कायम राहील.' राजाचा निरोप घेऊन दुर्वास ऋषी निघून गेले.

एवढे सगळे होईपर्यंत राजाने अन्नग्रहण केले नव्हते. त्यानंतर त्याने प्रसाद ग्रहण केला. या सगळ्या प्रसंगात आपल्याला प्राप्त झालेले सामर्थ्य म्हणजे श्रीभगवानांचा प्रभाव होय, असा भाव राजाच्या मनात निर्माण झाला. त्याने आपली सर्व कर्मे भगवानांना अर्पण केली. राज्यभार पुत्रावर सोपवून तो तपश्चर्येसाठी वनात गेला. भगवान वासुदेवाच्या ठायी त्याच्या चित्ताचा लय झाला होता. राजा ब्रह्मरूप होऊन कृतार्थ झाला. भगवद्‌भक्ती अंतःकरण किती उन्नत करते आणि परिपूर्णतेला कशी नेते याचं अंबरीश राजा हे प्रेरणादायी उदाहरण आहे.

(क्रमशः)

....❀....

## अभिनंदन



**नुकताच संस्कार भारती मुंबई आणि शाखा सांगली यांच्यातर्फे, सांगीतिक क्षेत्रातील कार्याबद्दल अभिषेक काळे याला सुनील बर्वे यांच्या हस्ते मटंगे बुवा पुरस्कार प्रदान करण्यात आला.**

**शास्त्रीय संगीतावर आधारित 'The Disciple' या मराठी चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रसारित झाला. या चित्रपटात अभिषेकने छोटी भूमिका साकारली आहे. नुकताच हा चित्रपट व्हेनिस चित्रपट महोत्सव (इटली) आणि टोरांटो चित्रपट महोत्सव अशा आंतरराष्ट्रीय महोत्सवांमध्ये प्रीमिअर म्हणून दाखवला गेला. चित्रपट सृष्टीसाठी ही अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे, कारण तब्बल २० वर्षांनंतर भारताने तिथे स्थान पटकावले आहे.**

**अभिषेक गेल्या ७-८ वर्षांपासून स्वरूपयोग केंद्राचा सदस्य आहे. बालसाधक ते युवासाधक अशा प्रवासात तो स्वरूपयोगच्या अनेक कार्यक्रमांत गानसेवा सादर करत आला आहे.**

**स्वरूपयोग परिवारातर्फे अभिषेकचे मनःपूर्वक अभिनंदन!**

## आध्यात्मिक साहित्यनिर्मितीच्या कार्यासाठी देणगी आवाहन

पू. स्वामीजींचे ग्रंथनिर्मितीचे कार्य अव्याहत चालू असते. त्यांच्या सुबोध, सूक्ष्म, अभ्यासपूर्ण, तसेच रसाळ विवरणांनी युक्त अशा ग्रंथांची साधक नेहमीच वाट पाहत असतात. पू. स्वामींनी विवरण केलेल्या अनेक महत्त्वाच्या विषयांवरील आणखीही ग्रंथांची निर्मिती करण्याची संस्थेची योजना आहे.

आधुनिक काळातील जास्तीत जास्त युवकांपर्यंत भारतीय अध्यात्मशास्त्राचा गाभा पोचवता यावा म्हणून आता संस्थेने स्वामींच्या मूळ मराठी भाषेतील अनेक ग्रंथांचा इंग्रजी अनुवाद करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. ध्यानयोग, श्रीगणपती अथर्वशीर्ष, तुकाराम महाराजांच्या अभंगांवरील विवरणात्मक 'दिव्यत्वाचा संस्पर्श', भगवद्गीता अध्याय १, भगवद्गीता नित्यपाठ, संवाद अशा ग्रंथांचे इंग्रजी अनुवाद तूर्त उपलब्ध आहेत. भगवद्गीतेचे उर्वरित अध्याय, श्रीरामरक्षा भावार्थसार, सार्थ श्रीशिवनामावली, परमामृत चिंतन अशा अनेक ग्रंथांच्या अनुवादाचे काम सध्या चालू आहे.

**आधुनिक टेक्नॉलॉजी द्वारे डिजिटल आऊटरीच**

व्हाट्सअ‍ॅप, यूट्यूब आणि फेसबुक या सोशल मीडिया उपकरणांचा वापर करून स्वरूपयोग आपल्या साधक परिवारापर्यंत स्वामींचे वाङ्मय सातत्याने पोचवत आहे. त्याचबरोबर झूम, साऊंडक्लाऊड यांसारख्या अ‍ॅपच्या विशेष सुविधा स्वरूपयोगने वर्गणी भरून (पेड सब्स्क्रिप्शन) घेतल्या असून, त्याद्वारा 'ऑनलाईन केंद्रे' घेतली जातात. तसेच स्वामीजींच्या विविध ऑडिओ रेकॉर्डिंग्ज जगभरातील साधकांपर्यंत पोचत आहेत.

मुद्रित व डिजिटल अशा दोन्ही स्वरूपांतील साहित्याची निर्मिती, तसेच त्यांसाठी लागणारी सॉफ्टवेअर्स व इलेक्ट्रॉनिक यंत्रणा यांसाठी संस्था वारंवार गुंतवणूक करत असते.

संस्थेचे सर्व उपक्रम साधकांच्या उत्साहपूर्ण सहभागानेच चालतात. साधकांनी आजपर्यंत संस्थेच्या कार्याचा सर्व आर्थिक भार उदार हस्ताने देणग्या देऊन उचलला आहेच. शाश्वत मूल्य असणाऱ्या या साहित्यनिर्मितीच्या कामासाठी ज्यांना अर्थिक योगदान देण्याची इच्छा असेल त्यांनी कृपया संपर्क करावा. त्यासाठी भारतीय देणगीदारांकरिता अंकात इतरत्र दिलेले निवेदन पाहावे.

# स्वातंत्र्यदिन विशेष स्वाध्याय

प्रसाद घारपुरे



'मेरा रंग दे बसंती चोला' हे गाणं भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांनी फाशीवर जाता-जाता गायलं. फाशीवर जात आहेत, पण त्यांना मरणाचं दुःख नाहीये. त्यांना त्याचा आनंद आहे आणि हसत हसत मृत्यूला कवटाळताना ते म्हणतात की 'मेरा रंग दे बसंती चोला'- माझं वस्त्र त्यागाच्या भगव्या रंगाने रंगू दे... आणि पुढच्या जन्मात देशाच्या स्वातंत्र्याकरताच काम करीन. हा मनाचा भक्कमपणा आहे. स्वामीजी नेहमी सांगतात की मनाचा भक्कमपणा अध्यात्मातून मिळतो. त्याचं प्रत्यक्षीकरण या क्रांतिकारकांनी राष्ट्रीय कार्यात केलं. 'शहीदों की मजारों पर हर बरस लगेंगे मेले, वतन पे मिटनेवालों का यहीं बाकी निशां होगा' हे त्यांचं आवडतं काव्य होतं आणि त्यालाच अनुसरून आजचा स्वाध्याय आपण बघणार आहोत.

१८५७च्या स्वातंत्र्यसमरापासून भारताच्या स्वातंत्र्यासाठीचे प्रयत्न सुरू झालेले होते. एका लेखामध्ये नव्वद वर्षांचा लढा कव्हर करणं अवघड आहे त्यामुळे आपण टप्प्याटप्प्याने पुढे जाऊ. आत्ताचा हा टप्पा आहे १९३१ सालापासूनचा. १९३१ सालामध्ये क्रांतिकारकांच्या क्रांतिकार्याला थोडीशी खीळ बसली आणि ती खीळ अत्यंत धोकादायक आणि दुःखदही होती. फेब्रुवारी १९३१मध्ये अलाहाबादला एका बागेत चंद्रशेखर आझाद यांचा इंग्रजांशी लढताना मृत्यू झाला. मार्च १९३१मध्ये भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव या तिघांनाही फाशी झाली. त्यामुळे १९३१ सालानंतर क्रांतिकारकांना दिशा देणारं भक्कम व्यक्तिमत्त्वच भारतामध्ये नव्हतं. चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, अशफाकउल्ला खान, रामप्रसाद बिस्मिल यांच्यासारखे सगळे दिग्गज एक तर फाशी दिले गेले होते, नाही तर इंग्रजांशी लढताना धारातीर्थी पडले होते. स्वातंत्र्यासाठी लढा देणाऱ्यांत जहाल आणि मवाळ असे दोन गट पडले होते. त्यांतला जहाल गट थोडा बॅकफूटवर आला. मवाळांची आंदोलनं, महात्मा गांधींचे सत्याग्रह चालूच होते. १९३१पासून १९३९पर्यंत क्रांतिकारकांचे हल्ले थांबले होते.

१९३९ साली नेताजी सुभाषचंद्र बोस कॉंग्रेसचे प्रेसिडेंट म्हणून निवडून आले, परंतु गांधीजींनी सुभाषबाबूंना त्यावर असं सांगितलं की, 'तू नको होऊस प्रेसिडेंट, नाही तर मी उपोषणाला बसेन.' सुभाषबाबूंनी प्रेसिडेंट पदाचा त्याग केला आणि सामान्य सत्याग्रही म्हणून काम करू लागले. कोलकत्यामधल्या आंदोलनात एका ब्रिटिशाचा पुतळा उखडण्यावरून गदारोळ झाला.

१९४० साली स्वातंत्र्यवीर सावरकर आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांची भेट झाली. सावरकरांनी सुभाषबाबूंना म्हटलं की, 'सुभाष, हे असे पुतळे उखडून स्वातंत्र्य मिळणार नाही. त्यासाठी आपल्याला सशस्त्र क्रांती ही चालू ठेवावीच लागेल. हिंदीत म्हणतात ना 'लातोंके भूत बातोंसे नहीं मानते'. ब्रिटिश सरकार आपली सगळी आंदोलनं सत्तेच्या जोरावर दडपून टाकेल. जालियनवाला बागेत जशी हत्याकांडं झाली तशी अनेक हत्याकांडं हे घडवतील. तू जपानला जा, तिथे आपले लोक आहेत. खूप मोठं कार्य करायचंय. पहिल्या विश्वयुद्धात जे बंदी बनलेले होते ते कैदी सोडवायचे आणि त्यांची एक फौज तयार करायची.' ते सगळे युद्धकैदी सिंगापूर आणि बर्मा (ब्रह्मदेश) येथे ठेवलेले होते.

१९४१च्या सुरुवातीला सुभाषबाबूंनी भारत सोडला. दोन

क्रांतिकारकांची परिस्थिती बघा- सावरकर म्हणताहेत 'ने मजसी ने परत मातृभूमीला सागरा प्राण तळमळला' आणि मातृभूमीच्याच कार्यासाठी दुसरा एक क्रांतिकारक स्वतःच्या मातृभूमीचा यापुढे सदैव त्याग करणार होता. भारताच्या स्वातंत्र्यासाठी भारताबाहेर जाऊन प्रयत्न करणार होता. सुभाषबाबू सिंगापूरला गेले आणि आझाद हिंद सेनेची स्थापना झाली. पहिल्या महायुद्धात सिंगापूर आणि ब्रह्मदेश येथे कैद करून ठेवलेल्या सैनिकांना सोडवून आणून सुभाषबाबूंनी आपल्या फौजेत सामील करून घेतले.

१९३९ साली जागतिक विश्वयुद्ध म्हणजे दुसरं महायुद्ध सुरू झालं. १९४२ ते १९४५ या तीन वर्षांच्या काळात ब्रिटिश सरकार कात्रीत सापडल्यासारखं झालं. या महायुद्धात जर्मनीने युरोप आणि ब्रिटन जवळजवळ बेचिराख केले होते. जपानी सैन्य चायनीज प्रदेश आणि पॅसिफिक (प्रशांत) महासागराची खालची बेटं जिंकत होतं. त्यामुळे अलाईड फोर्सेस- अर्थात अमेरिका, रशिया, फ्रान्स आणि ब्रिटन हे चार देश एकत्र लढा देत होते. मग भारत कुठे होता? भारत हा देश म्हणून प्रत्यक्ष युद्धात सम्मीलित झालेला नसला तरी भारताकडून हे युद्ध दोन्ही बाजूंनी लढलं गेलं. कसं? तर १८५७ साली भारताच्या खालसा केलेल्या संस्थानांचं सैन्य ब्रिटिश गव्हर्नमेंटने या द्वितीय महायुद्धात वापरलं. आत्ता हिस्ट्री टीव्ही 18 चॅनलवर 'फाइंडिंग ओल्ड हिरोज' नावाची एक सीरियल चालू आहे. अवश्य बघा. त्यात त्यांनी असं दाखवलेलंही आहे आणि हे ऐतिहसिक उल्लेखही आहेत, की आपले जवळजवळ तेरा लाख भारतीय सैनिक या युद्धात लढले होते. भारताच्या बाहेर मध्य आफ्रिका, नॉर्वेचे बर्फाळलेले प्रदेश इथे ब्रिटिश सैन्य जिंकलं; वास्तविक पाहता ते भारतीय जवान होते. आफ्रिकन वाळवंटात मराठा लाईट इन्फंट्री लढलीय. नॉर्वेमध्ये गुरखा, शीख व राजपुताना रेजिमेंट लढलीय. या सगळ्या रेजिमेंट्स जुन्या खालसा केलेल्या संस्थानांच्या नेटिव्ह रेजिमेंट्स होत्या. ही एक बाजू आणि दुसरी बाजू आझाद हिंद सेना.

आझाद हिंद सेनेने जर्मनीशी व जपानशी हातमिळवणी केली. युद्धामध्ये ब्रिटिशांच्या विरोधात त्यांनी भारताच्या आजूबाजूने दुसरी लढाई सुरू केली. भारतामधल्या नागालँड, कोहिमा, मणिपूरपर्यंत आझाद हिंद सेना आतमध्ये घुसली, आणि तिथले भाग स्वतंत्र केले. पहिल्यांदा देशाचा तिरंगा तिथे फडकला. अंदमान-निकोबार बेटंसुद्धा सुभाषबाबूंनी मुक्त केली. ज्या सेल्युलर जेलमध्ये सावरकर होते ते जेल पाडलं आणि तिथून आकाशवाणीवर सुभाषबाबू म्हणाले, की 'मी सावरकर बंधूंचा खूप आभारी आहे, की ज्यांनी एवढा मोठा त्याग केला आणि मला या सशस्त्र क्रांतीसाठी प्रेरित केलं.'

क्रांतिकारकांनी थोडी माघार घेतली असं वाटलं, तरी खरं तर त्यांनी फक्त त्यांची युद्धनीती बदलली होती. त्यांच्या जुन्या क्रांती-तंत्रानुसार, अनेक क्रांतिकारक सरकारच्या हाती लागून फाशी गेल्यामुळे क्रांतिकार्याची खूपच हानी होत होती. थोडे अलिप्त राहून पुन्हा संघटित होऊ आणि आझाद हिंद सेना, सावरकर आणि अजून काही क्रांतिकारकांच्या मार्गदर्शनाखाली एक मोठी लढाई लढू, असा विचार माघार घेण्यामागे होता.

१९४२ साली भारत छोडो आंदोलनाला स्वातंत्र्यवीर सावरकरांनी विरोध केला आणि आजही त्या विरोधाविषयी अनेक लोक आपले शास्त्रशुद्ध विचार मांडतात. त्या वेळेला सावरकर असं म्हणाले होते, की 'उठा हिंदूंनो, सैन्यात जा. ब्रिटिश सैन्यात गेल्यावर हत्यारं मिळतील, त्याचं प्रशिक्षण मिळेल. ब्रिटिश काम कसं करतात याची पूर्ण बातमी त्यांना मिळेल. ब्रिटिश सैन्याची मूव्हमेंट कळेल. तिथे काम करणाऱ्या आपल्या असलेल्या हिंदू आणि हिंदुस्थानी सैनिकांनाही ते प्रेरित करतील आणि मग ठरवू ना, बंदुकीची नळी कोणाच्या दिशेला करायची ते.' सावरकरांची योजना हीच होती की ब्रिटिश सैन्यातून आता हे प्रशिक्षित सैनिक बाहेर काढायचे आणि आझाद हिंद सेनेमध्ये नेऊन जमा करायचे. सुभाषबाबूंच्या कार्याला मदत करायची.

पण १९४५ साली जर्मनी विश्वयुद्ध हरली, जपान हरलं आणि बरोबरीने आपली आझाद हिंद सेनाही हरली. आणि त्यानंतर ही आंदोलनं झाली. त्यांमुळे असं म्हटलं जातं की 'दे दी हमें आझादी बिना खड्ग बिना ढाल'- मान्य आहे की, गांधीजींचं कार्य खूप महान होतं. त्यांनी खूप मोठी संघटना उभी करून एक फळी सांभाळून ठेवली होती. पण दुसऱ्या बाजूने आपल्या क्रांतिकारकांनी ब्रिटिशांना जे झोडपलंय त्यामुळे १९४५ सालापर्यंत आपले बरेचसे भूभाग हे ब्रिटिशर्सपासून अलिप्त व्हायला लागले होते. १९४५

साली जे ब्रिटिशांसाठी जे तेरा लाख सैनिक लढले होते, त्यांतले पंच्याहत्तर हजार बेपत्ता होते आणि पंच्याहत्तर हजार भारतीय सैनिक युद्धात कामी आले. कोणासाठी? तर ब्रिटिश सरकारसाठी. याचा पश्चात्ताप नेटिव्ह सैनिकांना झाला. १९४५ साली शेवटचा गव्हर्नर ॲडमन ॲटली इथे आला, तेव्हा ब्रिटन बेचिराख झालेला होता, भारत सांभाळत बसणं ब्रिटिशांना शक्य नव्हतं. त्यामुळे त्यांनी भारत सोडला. भारत सोडून जाताना त्याने लिहिलेलं एक वाक्य आजही त्याच्या डायरीमध्ये अव्हेलेबल आहे की, "We are handing over powers to India due to the fact that Indian army is no more loyal to Britain. Britain has no army to hold them back."

१८५७ साली ब्रिटिशांकडे सैन्य होतं. त्यामुळे १८५७च्या स्वातंत्र्यसमरामध्ये आपल्या सैन्याला हार पत्करावी लागली. पण महायुद्धातल्या भयानक हानीनंतर ब्रिटिशांकडे सैन्यच नव्हतं. जे भारतीय सैनिक होते, ज्या नेटिव्ह रेजिमेंट्स होत्या, त्यांच्यात पुन्हा एकदा क्रांतिकार्याची ठिणगी पडलेली होती आणि १८५७सारखा उठाव होईल अशी चिन्हं दिसू लागली होती. १९४५च्या थोडं आधी- १९४० साली मुस्लीम लीग संघटित झाली. पुढे त्यांनी पाकिस्तानची मागणी केली. त्याला महात्मा गांधींनी सपोर्ट केला. तरीही १९४७ सालापर्यंत अखंड हिंदुस्थानसाठी क्रांतिकारक शेवटपर्यंत लढत राहिले. जे ब्रिटिश जनरल्स आले, त्यांनी आयुष्यात कधी पंजाब, राजस्थान, काश्मीर बघितलाच नव्हता. कुठल्यातरी डेटाबेसवर त्यांनी उभ्या-आडव्या रेघा ओढल्या आणि भारत-पाकिस्तान फाळणी करून मोकळे झाले. १५ ऑगस्टला आपण स्वातंत्र्यदिन साजरा करतो, तेव्हा एका डोळ्यात आसू आणि एका डोळ्यात हसू अशीच अवस्था असते. ज्या अखंड मातृभूमीसाठी हे क्रांतिकारक हसत हसत फासावर गेले त्या मातृभूमीचे तीन तुकडे झाले. पूर्व पाकिस्तान, पश्चिम पाकिस्तान आणि मधल्या भूभागाला भारत असं संबोधतात.

ब्रिटिश जाताजाता काही सरळमार्गी गेले नाहीत. त्यांनी काश्मीरचा प्रश्न धगधगतच ठेवला. मग आपल्याला खरंच स्वातंत्र्य मिळालंय का? स्वातंत्र्य मिळालंय, पण आजही आपल्याला खूप काम करण्याची गरज आहे. त्यासाठी प्रत्येकाने सैन्यात जाण्याची गरज नाही. आपण जे काम करतोय ते स्वतःपेक्षा देशासाठी काम करतोय ही भावना आपण ठेवली, तर कुठेही 'स्वच्छता राखा' अशी पाटी लावायची गरज नाही. 'वाहतुकीचे नियम पाळा' अशीही पाटी लावायची गरज नाही. राष्ट्राला उच्च स्तरावर नेण्यासाठी या राष्ट्रप्रेमाच्या भावनेची गरज आहे. त्यासाठी आपल्याला आध्यात्मिक भूमिकेची गरज आहे, ज्यामुळे आपलं मन कणखर बनतं. ते आपण स्वरूपयोगमध्ये करतोच. स्वामीजी कायम म्हणतात, की अध्यात्म आणि राष्ट्रीयत्व हे हातात हात घालून गेले पाहिजेत. आपल्या स्वामी स्वरूपानंदांचेही राष्ट्रीयत्व आणि अध्यात्म दोन्हीचं काम आपण पाहिलं. त्यामुळे आपल्यावर भारतीय नागरिक म्हणून ही नैतिक जबाबदारी आहे. दर वेळेला नागरिक म्हणून हक्कांच्या गोष्टी करतो. आज आपल्याला जबाबदारीची गोष्ट करायचीय. देशाने आपल्याला काय दिलंय यापेक्षा आपण देशाला काय दिलंय हा प्रश्न विचारण्याची गरज आहे. देशाच्या पाठीवर, जगाच्या पाठीवर तुम्ही कुठेही असा. यूएसमध्ये असा, युकेमध्ये असा, नाही तर न्यूझीलंडमध्ये असा, भावना जर भारतासाठी काम करण्याची असेल तर नेताजी सुभाषचंद्र बोसांचं उदाहरण डोळ्यांसमोर ठेवायला हरकत नाही. देशाच्या बाहेर राहूनसुद्धा देशासाठी काम करता येतं. आजही देशापुढे खूप समस्या आहेत आणि त्या सोडवण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. त्यामुळे नुसतं स्वातंत्र्य नाही तर आपल्याला सुराज्यही निर्माण करायचंय. शास्त्र आणि शस्त्र दोन्हींचाही अभ्यास होणं गरजेचं आहे. **शास्त्रं संस्कृती सांभाळतात आणि शस्त्रं राष्ट्रीयत्व!**

आत्ताची परिस्थिती, पूर्ण देशाचा आढावा या सगळ्याला साजेशी एक सुंदर कविता आहे, त्या कवितेने मी या स्वाध्यायाचा शेवट करतो. ती कविता लिहिलीय श्यामसुंदर रावत यांनी. आपल्यापैकी अनेक लोकांनी ऐकली असेल. आशुतोष राणा नावाचा जो अभिनेता आहे त्याने ती बरेच वेळेला सादर केलेली आहे. त्या कवितेत सगळंच येतं. खूप सुंदर कविता आहे.

## हे भारत के राम जगो

हे भारत के राम जगो, मैं तुम्हें जगाने आया हूँ,
और सौ धर्मों का धर्म एक, बलिदान बताने आया हूँ।

सुनो हिमालय कैद हुआ है, दुश्मन की जंजीरों में
आज बता दो कितना पानी, है भारत के वीरों में।
खडी शत्रु की फौज द्वार पर आज तुम्हे ललकार रही
सोए सिंह जगो भारत के, माता तुम्हें पुकार रही।
रण की भेरी बज रही, उठो मोहनिद्रा त्यागो!
पहला शीश चढाने वाले माँ के वीर पुत्र जागो!
बलिदानों के वज्रदंड पर देशभक्ति की ध्वजा जगे
रण के कंकण पहने हैं, वे राष्ट्रहित की ध्वजा जगे।
खप्परवाली काली जागे, जागे दुर्गा बर्बंडा
रक्त बीज का रक्त चाटने, जागे माता चामुंडा।
नर मुण्डों की माला वाला, जगे कपाली कैलाशी,
रण की चंडी घरघर नाचे, मौत कहे प्यासी प्यासी।
'रावण का वध स्वयं करूंगा', कहने वाला राम जगे
'कौरव शेष एक न बचेगा', कहने वाला श्याम जगे।
परशुराम का परशु जागे, रघुनन्दन का बाण जगे,
यदुनन्दन का चक्र जगे, अर्जुन का धनुष महान जगे।
चोटीवाला चाणक्य जगे, पौरस पुरुष महान जगे,
सेल्युकस को कसने वाला, चन्द्रगुप्त बलवान जगे।
हठी हमीर जगे जिसने, झुकना कभी न जाना,
जगे पद्मिनी का जौहर, जागे केसरिया बाना।
देशभक्ति का जीवित झंडा, आज़ादी का दीवाना
रण प्रताप का सिंह जगे और हल्दी घाटी का राणा।
दख्खनवाला जगे शिवाजी, खून शहाजी का ताजा,
मरने की हठ ठाना करते, विकट मराठों के राजा।
छत्रसाल बुंदेला जागे, पंजाबी कृपाण जगे,
दो दिन जिया शेर के माफ़िक, वो टिपू सुलतान जगे।
कनवाहे[१] का जगे मोर्चा, जागे झाँसी की रानी,
अहमदशाह जगे लखनऊ का, जगे कुँवरसिंह[२] बलिदानी।
कलवोहे का जगे मोर्चा, और पानिपत मैदान जगे,
भगतसिंग की फांसी जागे, राजगुरू के प्राण जगे।
आजादी की दुल्हन को जो सबसे पहले चूम गया,
स्वयं कफन की गाँठ बाँधकर, सातों भांवर घूम गया।
उस सुभाष[३] की आन जगे, और उस सुभाष की शान जगे,
ये भारत देश की मान जगे, ये भारत की संतान जगे।
क्या कहते हो मेरे भारत से ये चीनी टकरायेंगे,
अरे चीनी को तो हम पानी में घोल घोल पी जायेंगे।
वो बर्बर था, वो अशुद्ध था, हमने उसको शुद्ध किया,
हमने उनको बुद्ध दिया था, उसने हमको युद्ध दिया।
आज बँधा है कफन शीश पर, जिसको आना है आ जाओ,
चाओ माओ चीनी-मीनी, जिस में दम हो टकराओ।
जिसके रण से बनता है, रण का केसरिया बाना,
ओ कश्मीर हडपने वाले, कान खोल सुनते जाना।
सन-सन करते वीर चलेंगे ज्योंबामी से फन वाला,
फिर चाहे रावलपिंडीवाले हो, या हो पेकिंग वाला।
जो हमसे टकराएगा वो चूर चूर हो जायेगा,
इस मिट्टी को छूनेवाला मिट्टी में मिल जायेगा।
मैं घर घर इन्कलाब की आग लगाने आया हूँ,
हे भारत के राम जगो मैं तुम्हें जगाने आया हूँ।

***काव्यातले संदर्भ***

*१. कनवाहे का मोर्चा १८५७च्या स्वातंत्र्यसमराच्या वेळी आपण अभ्यासला आहे.*

*२. अहमदशाह आणि कुँवरसिंह यांचीही वीरगाथा आपण १८५७च्या समराच्या वेळी अभ्यासली आहे.*

*३. सुभाषबाबूंनी पहिल्यांदा कोहिमा हा भारताचा भूभाग अधिकृत रीत्या स्वतंत्र झाला आहे असं जाहीर करून तिथे तिरंगा फडकवला.*

....❀....

## अभिनंदन



**पूजनीय स्वामींच्या अनुग्रहीत सुलभा बोडस यांची नात मृणाल अनंत बोडस, ज्युबिली कन्या शाळा, मिरज येथील विद्यार्थिनी इ. १०वीच्या परीक्षेत ९६.८% गुण मिळवून उत्तीर्ण झाली आहे.**

**मृणाल भरतनाट्यम्‌ची मध्यमा परीक्षाही उत्तीर्ण झाली आहे.**

**स्वरूपयोग परिवारातर्फे मृणालचे मनःपूर्वक अभिनंदन!**

## संतमहिमा कळण्यासाठी

एकदा पू. आईंना (संत कलावतीदेवींना) एका व्यक्तीने विचारलं, की 'आई, तुमच्या पाठीशी जगाचा संसार लागलेला असून तुम्ही सदा आनंदात कशा राहू शकता?'


या प्रश्नावर आईंनी उत्तर दिलं, 'मासा अहोरात्र पाण्यात असतो. तेव्हा तो झोप कसा घेतो याचं उत्तर तोंडाने सांगता येण्यासारखं नाही. त्यासाठी स्वतः मासाच झालं पाहिजे. त्याचप्रमाणे जो त्या स्थितीला पोचला असेल त्यालाच तसं राहणं जमतं. जिथे (म्हणजे ज्या स्थितीचं वर्णन करताना) वाणीच खुंटते तिथे प्रश्नाचं उत्तर कोण देणार!'

याबाबत संत तुकाराम महाराजांनी म्हटलं आहे,

तुका म्हणे अंगे व्हावे ते आपण।
तरीच महिमान येईल कळो॥

संतांची स्थिती म्हणजे चित्ताची अखंड ईश्वरस्वरूपाशी एकरूपता. आपण नुसता ईश्वराच्या अस्तित्वाचा भाव ठेवून नाममंत्र चालवायचा. तेव्हा ही स्थिती थोडा काळ राहणंही किती अवघड आहे हे कळू लागेल. पण आपण तसा प्रयत्न करत राहता राहता देवभावाचा थोडा थोडा स्पर्श आपल्या चित्ताला होत राहील.

## अभिनंदन



***अद्वैत केदार जोशी*** हा बालशिक्षण मंदिर, कोथरूड येथील विद्यार्थी असून त्याला इ. १०वीच्या परीक्षेत ९७.८% गुण मिळाले आहेत.

अद्वैत हार्मोनियमची मध्यमा परीक्षा उत्तीर्ण झाला आहे. स्वरूपयोगचे सांगली येथील साधक कार्यकर्ते श्री. जयंत व सौ. ज्योती आपटे यांचा तो नातू (त्यांची कन्या आरती जोशी हिचा मुलगा) आहे.

अद्वैतचे स्वरूपयोग परिवारातर्फे मनःपूर्वक अभिनंदन!

## साधकांसाठी निवेदन

सर्व साधकांनी खालील लिंकवर ऑनलाईन माहिती फॉर्म भरावा ही विनंती. यासाठी कोणतीही ट्रान्झॅक्शन फी लागत नाही.

https://swaroopyog.force.com/s/contact-details

यापुढे स्वरूपयोगच्या नवीन विकसित होत असलेल्या कोणत्याही तांत्रिक सुविधा (वेबसाईट तसेच अन्य सिस्टीम्स) या सर्व ठिकाणी आपला email id / फोन नंबर (शक्यतो whatsapp नंबर) जर डेटाबेसमध्ये रेकॉर्ड असेल तर आपल्याला या सर्व सुविधांचा वापर करता येईल, यासाठी सर्वांनी आपली माहिती स्वरूपयोगच्या डेटाबेसमध्ये आहे याची खात्री करून घ्यावी. ज्यांनी १ जुलै २०२० नंतर हा फॉर्म भरलेला आहे, त्यांनी पुन्हा भरण्याची आवश्यकता नाही.

आपण फॉर्म भरल्यानंतर जेव्हा submit कराल त्यानंतर आपल्याला registration successful असा मेसेज screen वर दिसेल, तसेच आपण फॉर्ममध्ये जो email address दिला असेल त्यावर confirmation पाठवले जाईल. हे मिळाले नसेल तर भरलेली सर्व माहिती नीट तपासून पाहावी. काही भरायचे राहिले असेल त्या ठिकाणी लाल रंगात error message दिसत असेल. तिथे योग्य ती माहिती भरून फॉर्म पुन्हा सबमिट करावा.

यात काही शंका असल्यास स्वरूपयोग ऑफीस किंवा श्री. आपटे काका (9284048397 /9423267725) यांच्याशी संपर्क साधावा किंवा swaroopyog.office@gmail.com वर कळवावे.

• ज्या ऋषिमुनींनी व सद्‌गुरूंनी अध्यात्मज्ञान आमच्यापर्यंत पोचवले आणि ज्या मागील पिढ्यांनी त्या संस्कारांवर आमचे पोषण केले, त्या सर्वांचे स्मरण!

सौ. रोहिणी मांडवगणे यांच्याकडून पृष्ठप्रायोजन •

# दासबोध दशक ६ समास ७ - सगुण भजन - पूर्वार्ध

अतुल दीक्षित



**ज्ञाने दृश्य मिथ्य जालें।**
**तरी का पाहिजे भजन केले।**
**तेणे काय प्राप्त जालें।**
**हे मज निरोपावें॥**

असे या समासाच्या सुरुवातीला शिष्य गुरूंना विचारतो. ईश्वर जर निर्गुण-निराकार आहे, आपल्या अंतर्यामी त्याचं ज्ञान झाल्यावर सबंध दृश्य विश्वच जर मिथ्या ठरतं, तर मग सगुणोपासना करण्याचं काय प्रयोजन?- शिष्याने घेतलेल्या या आक्षेपावरून हा समास सुरू होतो.

या समासाचं आणि एकूणच दासबोधाचं स्ट्रक्चर पाहिल्यास त्या लिहिण्यामागचा सायंटिफिक अप्रोच सहज प्रत्ययास येतो- जसं शिष्याने सुरुवातीला आपली शंका प्रामाणिकपणे व अगदी न संकोचता मांडणे, मग समर्थांनी त्या थिंकिंगमध्ये काय लुपहोल्स आहेत हे शिष्याला दाखवणे- यावरून असं दिसतं की वुई आर सीकर्स, नॉट मीअर बिलिव्हर्स ही उक्ती आपण पूर्वापार पाळत आहोत. गीतेमध्येही 'तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया' असे म्हटले आहे.

काय मानिला उपकार। कोण जाला साक्षात्कार।
किंवा प्रारब्धाचे अक्षर। पुसिलें देवें॥
होणार हे तो पालटेना। भजनें काय करावे जना।
हें तो पाहता अनुमाना। कांहीच न ये॥

म्हणजे एका अर्थाने आपल्या मनाविरुद्ध जर होणार असेल तर मग सगुणोपासनेची गरज काय, असा काही लोकांमध्ये असणारा स्वार्थी विचारदेखील यामध्ये अंतर्भूत आहे.

रेने देकार्त या प्रसिद्ध तत्त्वज्ञ आणि गणितज्ञाचे एक वाक्य आहे, 'कॉगितो, इर्गो सम' म्हणजे 'आय थिंक, देअरफोर आय ॲम'- याचा अर्थ विचार करण्याची क्रिया जर होत असेल तर विचार करणारा जो आहे, त्याचं अस्तित्व मानावंच लागेल. आपल्याकडे त्याहीपुढे जाऊन, जो विचार करणारा आहे त्याचं स्वरूप काय? त्याची अनुभूती कशी घेता येईल? हे स्वच्छपणे सांगितलं आहे. पण हा आत्मज्ञानाचा मार्ग, त्याबद्दलचं बोलणं हे कशाच्या माध्यमातून होतंय? शब्दांच्याच ना? मग सगुणाला इग्नोअर करून कसं चालेल?

'सगुणाचेनि आधारे। निर्गुण पाविजे निर्धारे।' यामध्ये म्हटल्याप्रमाणे सगुणाचा आधार हा लागणारच. ज्ञान झाल्यानंतर सगुणोपासनेची गरजच काय? या शिष्याच्या प्रश्नावर समर्थ त्याला चांगलंच खडसावतात.

'वक्ता म्हणे सावधपणें। सांग ज्ञानाची लक्षणें।
तुज काही लागे करणें। किंवा नाही॥
करणें लागे भोजन। करणें लागे उदक प्राशन।
मलमूत्रत्याग लक्षण। तेंही सुटेना॥
साहेबांसी लोटांगणे जावें। नीचासारिखें व्हावें।
आणि देवास न मानावें। हे कोण ज्ञान॥'

आत्मज्ञान झालं म्हणून शरीराचे विधिकर्म, नित्य व्यवहार, कर्मं थोडीच चुकणार आहेत? मग सगुण भक्ती तेवढी बंद करणं, यात कुठलं आलंय शहाणपण?

खरं तर संतजीवनप्रसंगातून कळतं की कोणत्याही संतांनी आत्मज्ञान झाल्यानंतर सगुण भक्ती सोडलेली नाही.

शिष्याचा वरचा प्रश्न हे त्याचं इमॅजिनेशन आहे. रामकृष्णांनी समाधीची उच्च अवस्था प्राप्त होऊनही कालीमातेची भक्ती सोडली नव्हती हे आपल्याला माहीत आहेच.

आत्मस्थिती प्राप्त झाल्यावर ती स्थिरावण्याकरिता सगुणोपासनाच आपल्याला दैनंदिन कर्मे करत असताना साहाय्यभूत ठरते. तुकाराम महाराजांच्या एका ध्यानकाळातल्या अनुभूतिपर अभंगाची सुरुवात 'अनुभवे अनुभव अवघाचि साधिला। तरी स्थिरावला मनु ठायी।' अशी असून त्याचा शेवट मात्र 'तुका म्हणे आम्हीं जिंकिला संसार। होऊनि किंकर विठोबाचे।' असा आहे. म्हणजे सगुण भूमिका सोडलेली नाहीच! सगुणोपासनेतून चित्त ईश्वराशी जोडलेलं राहतं.

धड आत्मज्ञान नाही आणि आपण ज्ञानाचा विचार समजल्याने ज्ञानी झालोय या वृथा अभिमानामुळे सगुणोपासना करायची नाही, मग आत्मदर्शनाप्रत वाटचाल कशी होणार?

पुढे समर्थ म्हणतात-

करी दुर्जनाचा संहार। भक्तजनासी आधार।
ऐसा हा तो चमत्कार। रोकडा चालें॥

पहिला चरण पाहिल्यावर आपल्याला हिरण्यकश्यपू, प्रल्हाद व खांबातून बाहेर येणाऱ्या नरसिंहाची कथा आठवते.

पण सगुणोपासना करून चित्त शुद्ध झालेल्या व्यक्तीपाशी असं शब्दसामर्थ्य असतं की त्याने दुष्ट जनांच्या दुर्मतीचाच संहार होतो. हेच तर ज्ञानेश्वर महाराज आपल्या पसायदानामध्ये 'जे खळांची व्यंकटी सांडो' या शब्दांमधून मागतात.

मनीं धरावें तें तें होतें। विघ्न अवघेंचि नासोन जातें।
कृपा केलियां रघुनाथें। प्रचित येतें॥

सगुण भजनाने मनात धरलेली इच्छा पुरी होते आणि आधी याच समासात शिष्य म्हणतो, 'होणार हे तो पालटेना। भजन काय करावे जना।'- या दोहोंमध्ये परस्परविरोध नाही काय? तर नाही. कारण यातला तिसरा चरण सर्वांत महत्त्वाचा आहे. मनातली इच्छा पुरी होते, सर्व विघ्ने नाहीशी होतात, पण कधी? तर जेव्हा रघुनाथ कृपा करतो तेव्हा. आता रघुनाथ ऊठसूठ सर्वांवर कृपा थोडीच करणार आहे? पूर्वी वैराग्यनिरूपण समासामध्ये समर्थांनी म्हटलंच आहे की,

'जरी भाव असला माईक। तरी देव होये महाठक।
नवल त्याचे कौतुक। जैशास तैसा॥'

जरी मनातल्या मनात चुकीची इच्छा धरून देवाचं भजन-पूजन केलं तरी ती इच्छा देव कशी काय पुरी करेल?

रघुनाथाची कृपा होणं ही काही सामान्य गोष्ट नाही. स्वामींनी 'अमूर्तपुजेची फुले' या पुस्तकात कृपेशी निगडित एक छान प्रसंग सांगितला आहे. स्वामी विश्वेश्वरानंदांनी एकदा सारदामातांना विचारलं की, 'जप-तप-ध्यान यांपैकी कशाने ईश्वराची प्राप्ती होते?' तर त्या म्हणाल्या, 'यांपैकी कशानेही नाही.' तीन वेळा तोच प्रश्न विचारूनसुद्धा माताजींनी हेच उत्तर दिलं. मग विश्वेश्वरानंदांनी विचारलं, 'मग त्याची प्राप्ती कशाने होते?' माताजी म्हणाल्या, 'ईश्वराची प्राप्ती त्याच्या कृपेने होते.' 'पण मग जप-तप-ध्यान का करावं?' त्यावर त्या म्हणाल्या, 'त्याची कृपा व्हावी म्हणून.'

स्वामी पुढे म्हणतात, की आपण जी साधना करतो, त्याने आपण स्वतःला ईश्वरीय कृपेसाठी योग्य करत असतो. लाटू महाराजांनीसुद्धा म्हटलंय की, 'देवाकडे कृपेची बँक आहे, पण त्यामध्ये आपल्या साधनेची पुंजी जमा करावी लागते.' साधना, उपासना यांमधून सात्त्विकता वाढीस लागून मनाची अशी ठेवण होते की, देवाकडे काही चुकीचं मागितलंच जात नाही.

## अभिनंदन



पुण्याच्या **कु. ईशा मंदार चिडगोपकर** हिने सी.बी.एस.ई. बोर्डाच्या १०वी च्या परीक्षेत ९७% मिळवून मेरिट लिस्टमध्ये क्रमांक पटकावला.

पुण्यातील सुप्रसिद्ध मिलेनियम नॅशनल स्कूलमध्ये ईशा शिकते. या शाळेत स्वरूपयोग कार्यकर्त्यांच्या सहकार्याने एक केंद्रही घेण्यात येते. शोभा चिडगोपकर या ध्यानकेंद्रात नित्य उपस्थित राहणाऱ्या, स्वामींच्या प्रवचनांचे लेखनकार्य करणाऱ्या एक निष्ठावंत कार्यकर्त्या म्हणून स्वरूपयोग परिवारात सुपरिचित आहेत. ईशा त्यांची नात आहे.

स्वरूपयोग परिवारातर्फे ईशाचे मनःपूर्वक अभिनंदन!

## अभिनंदन



**साक्षी रंजलकर** हिला बारावीच्या परीक्षेत ९८% गुण मिळाले. साक्षी हैद्राबाद येथील स्वरूपयोगच्या कार्यकर्त्या लता रंजलकर यांची नात आहे.

लता रंजलकर या गेली काही वर्षे हैद्राबाद येथील डावरे प्रशाला येथे स्वरूपयोगचे बालकेंद्र घेत आहेत, त्यामुळे त्या शाळेतील अनेक विद्यार्थी पुढे स्वरूपयोगच्या युवा केंद्रांशी जोडले गेले आहेत. साक्षीची आई सौ. हेमांगीही स्वरूपयोगच्या कार्यात सहभागी असते. साक्षीला अभ्यासाबरोबरच चित्रकलेची, विशेषतः स्केचिंगची आवड आहे.

स्वरूपयोग परिवारातर्फे या यशाबद्दल तिचे अभिनंदन!

## अभिप्राय

॥ओम् अमलेश्वराय नमः॥

प.पू.स्वामी माधवानंद यांस शि.सा.नमस्कार, वि.वि.,

स्वरूपयोग प्रतिष्ठान ही साईट बघताना त्याच्या ब्रीदवाक्यावर दृष्टी गेली- 'स्वरूपी राहाणे हा स्वधर्म.' या संबंधात स्वामी स्वरूपानंद यांची आठवण सांगण्यासारखी आहे. स्वामींचे बाबालाल पठाण या नावाचे मुसलमान शिष्य होते. गीता वाचताना 'स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः' असे वचन आले आणि मनामध्ये संभ्रम निर्माण झाला. त्या वेळी स्वामींच्या खोलीबाहेर ओटीवर ते आणि श्री. म. दा. भट बसले होते. बाबालाल पठाणांनी 'आता माझा धर्म कोणता?' असा म.दां.ना प्रश्न विचारला. त्याचे उत्तर आपण स्वामींनाच विचारू असे म. दा. म्हणाले. तेवढ्यात स्वामींच्या खोलीतून सेवक बाहेर आला व म्हणाला 'इथे बाबालाल कोण आहेत? त्यांना स्वामींनी सांगितलं आहे की स्वरूपी राहाणे हा स्वधर्म.'

आज आपला स्वाध्याय पूर्णपणे ऐकला. खरोखरच एक आगळावेगळा उपक्रम, त्यात आपले प्रबोधन आणि शिष्यांचा सहभाग मनाला भावला. दासबोधावरचे विवेचन अभ्यासपूर्ण होते. तसेच 'अहिंसा परमो धर्मः' याचा उत्तरार्ध 'धर्म हिंसा तथैव च' हा जाणीवपूर्वक सांगितला जात नाही. त्याचे यथायोग्य विवेचनही आवडले.

आपल्याला संगीताची आवड आहे हे अभंगगायनावरील प्रतिक्रियेतून समजले. माझ्याकडून स्वामी अमलानंदांनी काही रचना करून घेतल्या आणि त्यावर संगीत साजही चढवून घेतला. त्याची सीडी काढली आहे. त्यातील दोन काव्ये आपण ऐकली आहेत.

स्वाध्यायामध्ये तरुणही तयार होत आहेत ही आनंदाची बाब आहे.

कळावे, लोभ आहेच, वृद्धिंगत व्हावा ही विनंती.

आपला कृपाभिलाषी,

अनिल बेडेकर, डोंबिवली.

## निवेदन

कोविड १९च्या जागतिक आपत्तीमुळे काही महिने छापखाना बंद होता तसेच टपालसेवाही चालू नव्हती. त्यामुळे आपण एप्रिल २०२० आणि जुलै २०२० हे वार्तापत्राचे अंक इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठवले होते. ते सर्व साधकांपर्यंत पोचले असतील अशी आशा आहे. सर्वांनी केलेल्या सहकार्याबद्दल मनापासून धन्यवाद. ऑक्टोबरचा अंक नेहमीच्या रूपात आपल्या सर्वांच्या हाती मिळेल अशीही आशा आहे.

## अभिनंदन



कर्वेनगर येथील चंद्रचूड यांच्या बंगल्यात चालणाऱ्या स्वरूपयोगच्या ध्यानकेंद्राचे व्यवस्थापन पाहणाऱ्या व गेली कित्येक वर्षे कार्यकर्त्या म्हणून सर्वपरिचित असलेल्या सौ. वृषाली आठल्ये यांची कन्या **कु. मैत्रेयी सौमन बिस्वास** ही दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेत ९७% गुण मिळवून उत्तीर्ण झाली.

मैत्रेयीने चित्रकलेच्या इंटरमिजिएट ग्रेडच्या परीक्षेतही ए ग्रेड मिळवली आहे. तिच्या अभ्यासातील यशाप्रमाणेच उल्लेखनीय बाब म्हणजे २०१८ साली I-Earn या संस्थेतर्फे इंटरनॅशनल स्टुडंट एक्स्चेंज प्रोग्रॅममधून अमेरिकेत विंचेस्टर येथे आयोजित केलेल्या Youth Summit साठी भारतीय विद्यार्थ्यांचा एक ग्रुप पाठवला गेला. त्यात देशाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मैत्रेयीला प्राप्त झाली. या संधीमुळे ५० देशांतील विद्यार्थ्यांशी इंटरॲक्शन व खूप मोठे एक्स्पोजर मिळाल्याचे ती अत्यंत नम्रपणे सांगते.

मैत्रेयीचे स्वरूपयोग परिवारातर्फे मनःपूर्वक अभिनंदन!

## आमचे गीताध्ययन

सध्याच्या लॉकडाऊनच्या काळात आपला वेळ सत्कारणी कसा लावायचा हा विचार माझ्या मनात येत होता. तेव्हा मला आठवण झाली ती माझे मित्र श्री. हेमंत कर्वे यांची. त्यांच्याकडून एक वर्षापूर्वी आम्ही गीतापठण अध्ययनाचे शिक्षण घेत होतो. पण काही कारणाने त्यात खंड पडला होता. या लॉकडाऊनच्या निमित्ताने ते अध्ययन पुढे चालू ठेवण्याचा विचार परत आला. तसा मी त्यांना फोन केला. त्यांनीही लगेच होकार दिला. ते राहतात सहकारनगरमध्ये व आम्ही राहतो औंधमध्ये. पण अंतराचा प्रश्न आम्ही सोडवला डिजिटल माध्यमातून. मग मी, माझी पत्नी शोभा व मुलगी दीप्ती तिघेही जण या अध्ययनात सहभागी झालो.

हेमंत कर्वे यांनी गीताधर्म मंडळात गीतेचे अध्ययन केले आहे, तेसुद्धा बँकेतून रिटायर झाल्यानंतर. श्री शृंगेरी मठात जाऊन त्यांनी गीता पाठांतर स्पर्धेमध्ये पारितोषिक मिळवले आहे. रामकृष्ण मठामध्ये लहान मुलांना गीता शिकवण्यासाठी ते जात असत. त्यांनी शिकवलेल्या काही मुलांनी श्री शृंगेरी मठाच्या गीता पाठांतर स्पर्धेमध्ये बक्षिसे मिळवली आहेत.

त्यांची गीता शिकवण्याची पद्धत पाणिनीच्या व्याकरणानुसार शास्त्रशुद्ध आहे. गीता म्हणताना प्रत्येक शब्दाचा उच्चार ऱ्हस्व व दीर्घ अक्षरानुसार केला पाहिजे. जोडाक्षराचा उच्चार करताना त्यातल्या प्रत्येक अक्षराचा उच्चार करावयास पाहिजे. तसेच एखाद्या ऱ्हस्व अक्षरानंतर जोडाक्षर आल्यास त्या अक्षरावर आघात द्यावयास पाहिजे. प्रत्येक अनुस्वाराचा उच्चार हा पुढील अक्षरावर अवलंबून असतो. पुढचे अक्षर क वर्गातले असेल तर अनुस्वाराचा उच्चार ङ् करायचा. त वर्गातले असेल तर उच्चार न् करायचा. प वर्गातले असेल तर उच्चार म् करायचा.

विसर्गाचा उच्चारही विशिष्ट ठिकाणी विशिष्ट पद्धतीने करावयास लागतो. श्लोकाच्या ओळीत आठवे अक्षर ऱ्हस्व असल्यास न थांबता ती ओळ सलग म्हणावयाची. प्रत्येक श्लोकाची चाल वृत्तानुसार म्हणावयाची. जे साधक गीताधर्म मंडळात गीता शिकले आहेत त्यांना हे सर्व नियम माहीत असतात. यानुसार आपण गीता म्हणावयास लागलो की आपले उच्चार स्पष्ट होतात व अनायासे प्राणायाम घडतो. एक प्रकारचा सात्त्विक आनंदही मिळतो.

हे सर्व ते पहिल्यांदा म्हणून दाखवतात. मग आम्हांला म्हणावयास सांगतात. प्रत्येक श्लोक दोन–तीनदा म्हणवून घोटवून घेतात. काही चूक असल्यास दुरुस्त करून सांगतात. ते स्वत: गायक असल्यामुळे प्रत्येक श्लोक लयीत म्हणण्याचा त्यांचा आग्रह असतो.

प्रत्येक श्लोकाचा अर्थ जाणून घेण्यास आम्हांला स्वामींच्या पुस्तकांचा खूप उपयोग झाला. पण त्यांची पुस्तके पाचव्या अध्यायापर्यंत असल्याने पुढील अध्यायांचे अर्थ जाणून घेण्यास अडचण आली. गीता प्रेसचे 'साधक संजीवनी' हे पुस्तक मराठी भाषेमध्ये आहे व त्यात प्रत्येक शब्दाचा अर्थ, श्लोकाचा अर्थ व त्यावरचे भाष्य दिले आहे.

गीतेच्या अध्ययनाने आम्हांला गीतेची तोंडओळख झाली व गीतेचे महत्त्व पटले. गीतेचा प्रत्येक श्लोक आपणांस नवीन दृष्टी देतो. गीतेच्या पहिल्या अध्यायात भगवान श्रीकृष्ण अर्जुनाचे सर्व म्हणणे शांतपणे ऐकून घेतात. आपणसुद्धा दुसऱ्याचे म्हणणे प्रथम शांतपणे ऐकून घेतले पाहिजे व त्यावर विचार करून आपले मत मांडावयास पाहिजे. आपण दुसऱ्याचे ऐकून न घेताच आपले मत प्रदर्शित करत असतो. अर्जुन व श्रीकृष्ण यांचे संबंधच असे होते, की अर्जुन त्याच्या मनातल्या शंका नि:संकोचपणे परत परत विचारत होता व भगवान श्रीकृष्ण त्याच्या शंकांचे पूर्णपणे निरसन करत होते. संपूर्ण गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला कोठलाही उपदेश करत नाहीत. फक्त त्याला सत्य परिस्थिती काय ते सांगतात व प्रत्येक विषयाच्या दोन्ही बाजू व त्याचे परिणाम काय होतील ते सांगतात. शेवटी निर्णय काय घ्यायचा याचे स्वातंत्र्य अर्जुनाला देतात.

प्रत्येकाने आयुष्यात गीता जाणून घेणे व त्यानुसार आचरणात आणण्याचा प्रयत्न करणे हे उद्दिष्ट ठेवल्यास आपले जीवन आनंदी व समाधानी होईल यांत तिळमात्र शंका नाही.

**प्रदीप चंद्रचूड, पुणे**

## अभिनंदन



**बंगळुरू येथील अनुशा मंगेश परांजपे ही यंदाच्या सी.बी.एस.ई. १० वीच्या परीक्षेत ५०० पैकी ४८२ (९६.४%) गुण मिळवून उत्तीर्ण झाली.**

**प्रथम बेळगाव व नंतर बंगळुरू येथे स्वरूपयोग केंद्रांचा कार्यभाग सांभाळणाऱ्या व वाढवणाऱ्या विनया परांजपे यांची ती नात आहे.**

**स्वरूपयोग परिवारातर्फे अनुशाचे मन:पूर्वक अभिनंदन!**

## धर्मसंस्थापनार्थाय (श्रीमद्भगवद्गीता अध्याय ४)




ज्ञानाइतके पवित्र जगात दुसरे काहीही नाही. ज्ञानप्राप्तीत सर्व जीवनाचे सार्थक आहे म्हणून अभ्यासला आणि आचरला पाहिजे हा चौथ्या अध्यायावरील विवरण ग्रंथ- धर्मसंस्थापनार्थाय.

भगवान श्रीकृष्णांनी धर्माची स्थापना केली नाही, तर संस्थापना केली. धर्म विद्यमान होताच, त्याला कर्मयोगाचा बळकट पाया देऊन त्याची प्रतिष्ठापना केली. साधनारूप यज्ञातून स्वतःतच परमात्म्याचं दर्शन घेण्याचा योगमार्ग उजळला. ज्ञानाचं शिखर सर करण्यासाठी संतांच्या उपदेशाची शिदोरी, श्रद्धेची पताका आणि संयमाचा दंड घेऊन साधनेच्या तत्पर पावलांनी जायला शिकवलं.

ज्ञानप्राप्ती या उद्देशाला धरून धर्मविषयक गैरसमजुती, भोळसटपणा, अतिरेकीपणा काढून टाकून त्याला सुयोग्य आचरणाचा बळकट पाया देणाऱ्या आणि त्यासाठी कर्मयोग आणि अष्टांगयोग सांगणाऱ्या गीतेच्या चौथ्या अध्यायाचे सोपे आणि सरळ मार्गदर्शन या पुस्तकामध्ये योग प्रस्तावना, अवतार रहस्य, देवाचा न्याय आणि कर्माचे ज्ञान, साधना आणि ज्ञानयज्ञ, ज्ञानप्राप्तीसाठी तयारी व योग्यता आणि प्रेरणा या पाच भागांतून केले आहे.





## कर्म-ज्ञानयोग (श्रीमद्भगवद्गीता अध्याय ५)

गीतेच्या पाचव्या अध्यायाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे, कर्माच्या प्रांतातून कर्मयोग आचरीत, ध्यानयोगाचे अवलंबन करून, योगी ज्ञानाच्या अवस्थेत कसा जातो, त्याचे सुंदर वर्णन यात आले आहे.

जणू एखाद्या पर्वतराजीच्या पायथ्याशी एखादी सुंदर नदी असावी, तिच्या अलीकडच्या भागात शेता-शेतांतून नदीपर्यंत जाणारा मार्ग असावा, पलीकडे नदीपासून उंच डोंगरामध्ये जाणारी अरुंद पाऊलवाट असावी आणि अलीकडचा मार्ग व पलीकडची वाट यांना जोडणारा एक छान पूल असावा, तसा हा पाचवा अध्याय आहे. कर्मयोगाच्या मार्गावरून चालत ध्यानयोगाच्या पुलावरून योगी ज्ञानयोगाच्या वाटेवर जात आहे आणि तिथून ज्ञानाच्या उंचीवर पोचत आहे असे या पाचव्या अध्यायाचे त्रि-योग दर्शन आहे.

इथे वर्णन केलेला योगी कर्ममार्गावरून चांगलाच प्रगत झालेला आहे आणि त्यामुळेच ज्ञानस्थितीमध्ये तो कसा पोचतो हेही या अध्यायात पाहता येते. ज्ञानी पुरुषांच्या अंतरंग स्थितीचे आणि लक्षणांचे अप्रतिम वर्णन या अध्यायात आलेले आहे.

## श्रीमद्भगवद्गीता नित्यपाठ




अध्यात्मशास्त्र म्हणजे नक्की काय हे थोडक्यात यात आले आहे. आपल्या जीवनात चैतन्यपूर्ण क्रियाशीलता आणून त्यातून अंतरंग अत्यंत शुद्ध करून घेण्याची कला शिकण्यासाठी गीतेच्या या १२८ श्लोकांचा नित्यपाठ करावा. ऐहिक जीवन उन्नत करण्यासाठी लागणारे मनाचे स्थैर्य, एकाग्रता, नवनिर्मिती करण्याची शक्ती आणि बुद्धीची तेजस्विता यातून प्राप्त होईल.

आत्मस्वरूप जाणून घेऊन दैवी गुणांची संपत्ती लाभण्यासाठी या नित्यपाठाच्या श्लोकांचा प्रयोग दैनंदिन जीवनात केल्याने व्यक्तिमत्त्वाचा खरा विकास होऊन ईश्वरीय एकरूपतेचा योग प्राप्त करून घेण्याचा अंतरंग मार्ग प्रकाशित होईल.




संयम, साधना, सद्गुण, सेवा, समर्पण आणि स्वानंद या षट्दलांनी युक्त कर्म, भक्ती आणि ज्ञानयोगाच्या मकरंदासह पूर्ण उमललेले सुंदर आणि सुगंधित जीवनपुष्प सर्वात्मक ईश्वराच्या चरणी वाहण्यास हा गीता नित्यपाठ प्रेरणा देईल.

'धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे' आणि 'श्रीमद्भगवद्गीता नित्यपाठ' या दोन्ही पुस्तकांचे इंग्रजी अनुवादही उपलब्ध आहेत.

If Undelivered Please Return To:
स्वरूपयोग प्रतिष्ठान
८८५/३, शिवाजीनगर, भांडारकर रोड, गल्ली क्र. ६, पुणे-४११ ००४,
दूरध्वनी : ०२० २५६५२४५७
ई-मेल: swaroopyogvp@gmail.com । वेबसाईट: www.swaroopyog.net
Registered with Registrar of Newspapers for India, New Delhi Under No. MAH-MAR-70780/99 dated 24-5-99

**आपण सगळे ज्याची आतुरतेने वाट पाहत आहोत, तो सहाव्या अध्यायावरील विवरण ग्रंथ लवकरच आपल्या भेटीला येईल...**

गुरुदेव रानडे यांनी असे म्हटले आहे, की 'गीता हे ईश्वरसाक्षात्कारयोगाचे तत्त्वज्ञान आहे.' त्याची प्रक्रिया सहाव्या अध्यायामध्ये सांगितली आहे, म्हणून या अध्यायाला विशेष महत्त्व आहे.

योगप्रक्रियेद्वारा ध्यानयोग साधल्यावर योगी आत्मस्वरूपयुक्त होतो आणि तो आत्यंतिक सुख प्राप्त करून घेतो. त्यातून पुढे तो विश्वतादात्म्य पावून समत्वयोगाच्या अत्युच्च स्थितीचे शिखर गाठतो, या अंतिम स्थितीचे वर्णन श्रीभगवानांनी या अध्यायात केले आहे.

संपूर्ण जीवनाचे जे काही शास्त्र आहे, अनुभव आहे, प्रबोधन आहे, ते सर्व महाभारताच्या एक लक्ष श्लोकांमधून प्रकट केले गेले आहे असे म्हटले जाते. 'या महाभारतरूपी कमळाच्या परागाचा कंद म्हणजेच भगवद्गीता!' असे श्रीज्ञानेश्वर महाराजांनी म्हटले आहे. या परागकंदाच्या गोडीची अनुभूती म्हणजे हा सहावा अध्याय- इतके या अध्यायाला महत्त्व आहे.